RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

आमची निष्ठा देशासाठी, तर काहींची कुटुंबासाठी- पंतप्रधान
पान २ पाहा

मराठी
# अक्रॉस मुंबई
संपादक- संजय मंगेश भैरे

स्वच्छता अभियान लोकचळवळ व्हावी-मुख्यमंत्री
पान ५ पाहा

वर्ष: ९ अंक : ०८ मुंबई, मंगळवार १६ ते २२ जानेवारी '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

## गोरेगाव येथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास अधिकाऱ्यांची टाळाटाळ

## 256 परिवारांचे जीव धोक्यात

■ मुंबई

पी/दक्षिण विभाग हे सध्या भ्रष्टाचाराचा अड्डा बनला असून आर्थिक घेवाण देवाण करून येथील अधिकाऱ्यांचा अनधिकृत बांधकामांवर वरद हस्त असल्याचे दिसून येत आहे. एकदा अनधिकृत बांधकामावर कारवाई केल्यानंतर त्याच जागेवर पुन्हा अनधिकृत बांधकामाला सुरुवात होत असल्याचे दिसून येत आहे.




चामुंडा सहकारी सोसा. , तीन डोंगरी, गोरेगाव पश्चिम च्या शेजारी मोकळ्या भूखंडावर २००० फुटांचे जी+1 अनधिकृत बांधकाम जुलै महिन्यापासून सुरू आहे. त्याची तक्रार उन्नत नगर मनपा शाळाचे मुख्याध्यापक अनिल यादव यांनी पी/दक्षिण कार्यलयात नोंदविली आहे. शाळेच्या कंपाऊंड वॉल वर अनधिकृत बांधकाम करून शाळेतील मुलांच्या जिवीताला धोका निर्माण होण्यासारखे काम कोणतीही परवानगी न घेता केलेले आहे. यासंद्रर्भात पी दक्षिण चे अधिकारी शिंगाडे व सहा. आयुक्त संजय जाधव यांच्याकडे तक्रार केली असता, ही एसआरएची इमारत आहे त्यामुळे आमचा याच्याशी काहीही संबंध येत नसल्याचे त्यांनी सांगितले. याच ठिकाणी एसआरएच्या सातमधल्या तीन इमारती उभ्या आहेत. या तीनही इमारतीत सुमारे २५६ परिवार वास्तव्यास आहे. अष्टविनायक, मॉर्निंग स्टार व नीलकमल या इमारतीच्या गेटवर हे अनधिकृत बांधकाम झालेले आहे.दुर्दैवाने या ठिकाणी कोणतीही दुर्घटना झाल्यास अग्नीशमनद्दलाच्या गाड्या किंवा अँम्बुलेंसला सुद्धा येण्याचा मार्ग नाही.





लोकांचे प्राण जाऊ शकते. असा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर महाराष्ट्राचे लोकप्रीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मनपा आयुक्तांनी लवकरात लवकर व क़डक कारवाई करावी, अशी गोरेगावातील प्रबुद्ध जनतेची मागणी आहे.

एसआरएचे सीईओ सतीष लोखंडे यांना सुद्धा या बांधकामाबद्दल तक्रारी देण्यात आल्या असून त्यांनी या बांधकामावर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे आदेश द्यावे अशी येथील सर्व नागरिकांची आशा आहे.

आताच गोरेगाव पश्चिम येथील आझाद मैदानच्या शेजारी जयभवानी या एसआरएच्या इमारतीला आग लागून 8 लोक मृत्युमुखी व ५५ लोक जखमी झाल्याची घटना ताजी असताना पुन्हा हे असे अनधिकृत बांधकामे करण्याच मनपा अधिकारी परवानगी देत असल्याचे दिसून येते. सहायक आयुक्तांना हे सुद्धा माहिती नाही की एसआरएच्या इमारतीला भोगवाटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्याइमारतीची पूर्ण जबाबदारी मनपाची असते. त्याअनुषंगाने 5 फेब्रुवारी 2021 रोजीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांचे सर्क्युलरसुद्धा दाखविले. त्याबद्दल बोलताना सहायक आयुक्तांनी स्पष्ट सांगितले की आम्ही ह सर्क्युलर मानत नाही.

पी/दिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या अशा अनागोंदी कारभारामुळे गोरेगाव विभागात कधीही मोठी दुर्घटना घडून

अनेक लोकांनी दिलेल्या तक्रारीवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही त्यामुळे या तक्रारदारांनी आमच्या कार्यालयात येऊन याबद्दल कळविले. त्याअनुषंगाने सहाय्यक आयुक्त संजय जाधव यांच्याकडे पी.जी मध्ये पाचवेळा सहायक आयुक्तांची भेट घेतली परंतु सहायक आयुक्त हे या अनधिकृत बांधकामाकडे जाणूनबुझून दुर्लक्ष करित असल्याचे दिसून आले. प्रत्येकवेळी फक्त आश्वासनच देण्याचे काम केले. पण अनधिकृत बांधकामावर कोणतीही कारवाई अजूनपर्यंत केलेली नाही.

## राहुल नार्वेकरांच्या निकालाविरोधात ठाकरे गटाची सर्वोच्च न्यायालयात धाव

■ नवी दिल्ली

आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी महत्त्वाच्या निकालाचं वाचन केलं. त्यानुसार, ठाकरे आणि शिंदे गटातील आमदार अनपेक्षितपणे पात्र ठरले असून खरी शिवसेना म्हणून शिंदे गटाला मान्यता देण्यात आली. त्यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला आहे. याविरोधात कायदेविषयक लढाई लढण्याकरता त्यांनी आता सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात या निकालाविरोधात याचिका दाखल केली असल्याचे वृत्त कायदेशीर वृत्तस्थळ असलेल्या लाईव्ह लॉने दिले आहे.




मे २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवलं. तसंच, मर्यादित कालावधीत याबाबतचा निकाल देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, या सुनावणीला जून महिन्याच्या अखेरीस प्रत्यक्षात सुरुवात झाली. परंतु, ही सुनावणी अखंडित होऊ शकली नाही. सुनावणीला वेग यावा आणि लवकर निकाल लागावा म्हणून ठाकरे गटाने पुन्हा सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले. त्यामुळे सर्वोच्च न्यायलयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पुन्हा मर्यादित काळात निकाल देण्याचे आदेश दिले. त्यानुसार, सुनावणी सुरू झाली. दोन्ही गटांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर याप्रकरणी ३१ डिसेंबरपर्यंत निकाल लागण्याची शक्यता होती. परंतु, राहुल नार्वेकर यांनी पुन्हा वेळ वाढवून मागितला.

राहुल नार्वेकरांची मागणी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली आणि १० जानेवारीपर्यंत निकाल देण्याचे आदेश दिले. त्यानुसार, बहुप्रतिक्षित अशा या निकालाचं वाचन १० जानेवारी रोजी मुंबईतील विधानभवनात झाले. त्यानुसार, राहुल नार्वेकरांनी २०१९ सालची शिवसेनेची घटनादुरुस्ती अवैध ठरवून उद्धव ठाकरेंचं पक्षप्रमुख पदही अमान्य केलं. तसंच, १९९९ ची पक्षघटना आणि बहुमताच्या आधारे शिंदे गटच खरी शिवसेना असल्याचं मान्य केलं. शिंदे गटाला खऱ्या शिवसेनेची मान्यता देताना राहुल नार्वेकरांनी शिंदे गटातील १६ आमदार पात्र ठरवले. तसंच, ठाकरे गटाच्याही १४ आमदारांनाही पात्र ठरवले आहे.

ठाकरे गटाने शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. परंतु, हे प्रकरण राहुल नार्वेकरांकडे गेल्यानंतर त्यांनी शिंदे गटातील १६ आमदारांना पात्र ठरवले गेले. त्यामुळे राहुल नार्वेकरांच्या या निकालाविरोधात ठाकरे गटाने आता पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. हे प्रकरण राहुल नार्वेकरांकडे सुपूर्द करतानाच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं होतं की, राहुल नार्वेकरांच्या निकालातून न्याय मिळाला नसल्याचं जाणवल्यास याचिकाकर्ते पुन्हा सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतात. त्यानुसार, उद्धव ठाकरे गटाने पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

## दावोसमधील परिषदेतून राज्यात सर्वदूर गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट्य

■ मुंबई

स्वित्झर्लंडमधील दावोस येथे होणाऱ्या जागतिक आर्थिक परिषदेच्या बैठकीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मंगळवारी १६ जानेवारी रोजी दावोस येथे शिष्टमंडळासमवेत उपस्थित राहणार असून या परिषदेतील प्रमुख बैठकीत ते "नागरी क्षेत्रातील आव्हाने, नाविन्यपूर्ण उपक्रम व शाश्वत विकास या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या परिषदेत प्रथमच विक्रमी असे तीन लाख दहा हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात येणार आहेत.

दावोस येथे १५ ते १९ जानेवारी या कालावधीत जागतिक आर्थिक परिषद होणार आहे. या परिषदेसाठी मुख्यमंत्र्यांसह, उद्योग मंत्री उदय सामंत तसेच उद्योग विभाग, एमआयडीसी, मुख्यमंत्री सचिवालयातील वरिष्ठ अधिकारी असे दहा जणांचे शिष्टमंडळ जात आहे. एमएमआरडीए व महाप्रित येथील ८ अधिकारी स्वतंत्ररित्या सहभागी होत असून या सर्वांना केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. या दौऱ्यामध्ये खाजगी विमानाचा वापर होणार नाही असेही स्पष्ट करण्यात आलेले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दावोस येथे महाराष्ट्राचे शिष्टमंडळ सहभागी होण्याची ही दुसरी वेळ असून गेल्या वर्षी या परिषदेत १ लाख ३७ हजार कोटींचे गुंतवणूक करार झाले होते. त्यापैकी ७६ टक्के करार प्रत्यक्षात आले आहेत.

या परिषदेसाठी यंदाही भारताच्या दालनाच्या जवळ महाराष्ट्राचे अद्ययावत असे दालन (पॅव्हिलियन) उभारण्यात आले असून याठिकाणी मुख्यमंत्री हे सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करतील तसेच मुख्यमंत्री प्रमुख विदेशी उद्योगाच्या प्रमुखांशी देखील चर्चा करतील. यासाठी या दालनात बैठक कक्ष बनविण्यात आले आहेत तसेच महाराष्ट्राच्या घोडदौडीविषयी माहिती देणारे दृकश्राव्य प्रदर्शन देखील याठिकाणी असेल.

## शिष्टमंडळ स्वत:च्या खर्चानं दावोसला गेलंय, या दौऱ्याचा सगळा हिशोब जनतेला देऊ, उदय सामंतांचे आदित्य ठाकरेंना प्रत्युत्तर

■ मुंबई

महाराष्ट्राला एक एक रुपयांचा हिशोब दिला जाईल, असं म्हणत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आदित्य ठाकरेंच्या टिकेला प्रत्युत्तर दिलं आहे. दावोसला जे शिष्टमंडळ गेलंय ते स्वत:च्या खर्चानं गेलं आहे. सध्या अनेक आरोप केले जातायत, पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा दौरा ऐतिहासिक दौरा ठरणार असल्याचं यावेळी उदय सामंत यांनी म्हटलं. दावोसचा दौऱ्यावर आदित्य ठाकरेंनी टिका करत या दौऱ्याचा हिशोब द्यावा असं म्हटलं होतं. त्यावर उदय सामंतांनी प्रत्युत्तर दिलंय.

दावोसला जिथे 5-6 लोकांचे काम आहे. तिथे एवढे लोक का घेऊन



जाताय? बॅग उचलायला असा सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देत उदय सामंतांनी म्हटलं की, जे कधीही स्वत:च्या खर्चाने गेले नसतील त्यांना या गोष्टीचं अप्रुप वाटणारचं. पण या सगळ्याचा हिशोब दौरा झाल्यानंतर महाराष्ट्राच्या जनतेला दिला जाईल.

मी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मी महाराष्ट्राच्या जनतेला शब्द देतो की 19 तारखेला आल्यानंतर पुढच्या दोन दिवसांमध्ये शासनामार्फत खर्च झालेल्या रुपयाचा हिशोब दिला जाईल. हा हिशोब पुराव्यानिशी दिला जाईल. आजचे आकडे जे आहेत, त्याकडे आपण मनोरंजन म्हणून पाहावं. त्यांच्या काळात चांगले एमओव्यू झाले नाहीत आणि आमच्या काळात ते होतायत. हा मुख्यमंत्र्यांचा दौरा महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक होणार असल्याचं उदय सामंत यांनी म्हटलं.

**त्यांनी आम्हाला शिकवू नये - उदय सामंत**

जो वेदांता फोक्सकॉन आम्ही कधी घालवला नव्हता तो घालवल्याचा आरोप आमच्यावर केला जातोय. इतरही काही आरोप झाले. पण याच्या पलिकडे जाऊन महाराष्ट्राची बाहेरुन उद्योजक आणण्याची ताकद किती आहे, हे यावरुन सिद्ध होईल. तसेच ज्यांनी पोलिसांच्या हातून महाराष्ट्राच्या उद्योजकांच्या घराखाली बॉम्ब ठेवले त्यांनी किती लोकांचं शिष्टमंडळ घेऊन जावं याचं मार्गदर्शन करु नये. यामधील बरचंस शिष्टमंडळ हे स्वत:च्या खर्चाने तिकडे गेलं आहे. ज्यांनी कधीही स्वत:च्या खिशातून पैसे काढले नाही,त्यांना हे अप्रुप असू शकतं. त्यामुळे जागतिक पातळीवर महाराष्ट्राचं नाव मोठं करण्यासाठी काही जण स्वत:च्या खिशातून पैसे खर्च करत असतील त्यामागे काहीही गैर नाही, असं उदय सामंत यांनी म्हटलं.

## धारावीकरांना 350 चौरस फूट जागा मिळणार, अदानींचा शब्द

■ मुंबई

धारावीमधील पात्र रहिवाशांना स्वतंत्र स्वयंपाकघर आणि शौचालये असलेले किमान 350 चौरस फूट आकाराचे सदनिका मिळणार आहेत, अशी घोषणा अदानी समूह आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील संयुक्त उपक्रम असलेल्या धारावी पुनर्वसन प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेडने (डीआरपीपीएल) या विशेष हेतू कंपनीने आज केली. धारावीतील घराचे हे क्षेत्रफळ मुंबईतील अन्य झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांमध्ये सर्वाधिक म्हणजे तब्बल 17 टक्के अधिक आहे.

"सर्व धारावीकरांसाठी नवीन सदनिका या स्वप्नातील घरे असतील आणि त्यांचे राहणीमान उंचावतील. धारावीकरांच्या आकांक्षांचे प्रतिबिंब प्रत्येक घरात दिसेल. सर्वसामान्य मुंबईकरांच्या भावनांमध्ये ते नेहमीच दिसत असते. धारावी पुनर्वसन प्रकल्पात धारावीचा आत्मा अबाधित राखून ही स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असे धारावी पुनर्वसन प्रकल्प प्रा. लि. च्या (डीआरपीपीएल)ने सांगितले.

धारावीची संस्कृती जपून विकास करणार

पात्र निवासी सदनिका म्हणजे 1 जानेवारी 2000 च्या आधी अस्तित्वात असलेल्या सदनिका आहेत. प्रत्येक फ्लॅटमध्ये स्वतंत्र स्वयंपाकघर आणि स्वतंत्र शौचालय असेल आणि हे फ्लॅट्स सुरक्षित असण्यासोबतच त्यात चांगला उजेड असेल. ते हवेशीर आणि आरोग्यदायी असतील. धारावीची चैतन्यमय आणि वेगळी उद्योजकीय संस्कृती अबाधित ठेवून धारावीचा व्यावसायिक आणि औद्योगिक परिसर म्हणून विकास करण्याचा आणि जागतिक स्तरावर जोडलेले शहर बनवण्याचा डीआरपीपीएलचा प्रयत्न आहे.



धारावीकरांचे जीवनमान उंचावणे, आर्थिक संधी, भविष्य घडविणारे शिक्षण तसेच व्यावसायिक प्रशिक्षण, आधुनिक आरोग्य सुविधा आणि दर्जेदार जीवनशैली हे सारे धारावी आणि नवी धारावी येथे उपलब्ध असेल. त्यांच्यासाठी सामाजिक सभागृहे, मनोरंजन क्षेत्र, सार्वजनिक उद्याने, दवाखाने आणि मुलांसाठी संगोपन केंद्रे देखील असतील.

अपात्र निवासी सदस्यांना देखील घरं मिळणार

धारावीतील अपात्र निवासी सदनिका धारकांना महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या नियमांनुसार प्रस्तावित, परवडणाऱ्या भाड्याच्या गृहनिर्माण धोरणांतर्गत निवासस्थान देण्यात येईल. यासाठी, मोठ्या संख्येने झोपड्यांमध्ये असलेल्या रहिवाशांच्या अनेक गरजा लक्षात घेऊन नव धारावीमध्ये, धारावीसारखा विकास करण्यात येईल. डीआरपीपीएलने धारावीचा कायापालट करण्याचे आव्हान स्वीकारले असून या बहुप्रतिक्षित परिवर्तन प्रकल्पासाठी सर्व हिस्सेधारकांकडून मिळणारा पाठिंबा आमच्यासाठी बहुमूल्य आहे. त्यातून सिंगापूर आणि इतर प्रगत राष्ट्रांमध्ये अशा योजनांसाठी ज्या प्रक्रिया पाळल्या जातात त्यांचे सर्वोत्तम पद्धतीने असे पालन करण्यात येईल की, उर्वरित जगासाठी झोपडपट्टी पुनर्वसन आणि शहरी पुनरुज्जीवनाचे नवे मानदंड निश्चित होतील.

डीआरपीपीएल नक्की काय?

धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेड (डीआरपीपीएल) ही अदानी समूह आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील संयुक्त उपक्रम म्हणून स्थापन केलेली एक विशेष उद्देश कंपनी आहे. धारावीकरांना आधुनिक घरे उपलब्ध करून देऊन आणि त्यांच्या अंगभूत उद्योजकतेची भावना जपतानाच त्यांच्या जीवनात परिवर्तन आणि सुधारणा करण्याचे डीआरपीपीएलचे उद्दिष्ट आहे. मनुष्य केंद्रीभूत ठेवून केले जाणारे हे परिवर्तन मोकळ्या जागेची पुनर्बांधणी आणि नव्या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेले सामुदायिक राहणीमान, वाहतूक सुविधा, वीज, पाणी आणि इंटरनेट या अत्याधुनिक अत्यावश्यक बाबींवर आधारित आहे आणि स्वच्छ वातावरण असलेल्या तेथील परिपूर्ण नागरी सुविधा दर्जाचा मानदंड उभा करतील.

## काँग्रेस नेते मिलिंद देवरांचा शिवसेनेत प्रवेश

## मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत हाती घेतला धनुष्यबाण

प्रतिनिधी
■ मुंबई

काँग्रेसचे माजी केंद्रीय राज्यमंत्री मिलिंद मुरली देवरा यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यानंतर शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी धनुष्यबाण हाती घेतला.



राहुल गांधी यांनी पुन्हा पक्षाध्यक्ष करण्यास विरोध करणाऱ्या 'जी 23' गटाचे सदस्य असलेले काँग्रेसचे माजी केंद्रीय राज्यमंत्री मिलिंद मुरली देवरा यांनी अखेरीला काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आहे. स्वतः मिलिंद देवरा यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. कालपासून मिलिंद देवरा हे शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या

### काँग्रेस सोडेन असे वाटले नव्हते

*मिलिंद देवरा म्हणाले, "मी खूप भावनिक आहे. मी काँग्रेस सोडेन कधी वाटलं नव्हतं. काँग्रेस पक्षाशी ५५ वर्षे असलेले नाते मी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली संपवत आहे. माझं राजकारण नेहमीच सकारात्मक राहिलं आहे. माझी विचारधारा मुंबई, महाराष्ट्र आणि देशातील नागरिकांनी सेवा करणं आहे. मुख्यमंत्री शिंदे मेहनती असून सर्वांसाठी उपलब्ध असतात. म्हणून त्यांचे हात आणखी बळकट करायचे आहेत. तसेच, शिवसेनेच्या माध्यमातून यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचेही हात बळकट करायचे आहेत."*

### मतदारसंघात मोठा जनसंपर्क

*मिलिंद देवरा हे माजी मंत्री आणि माझी खासदार राहिलेले आहेत. दक्षिण मुंबईमध्ये गुजराती, मारवाडी, जैन समाज आहे, तो मोठ्या प्रमाणात मिलिंद देवरा यांच्या संपर्कात आहे. तसेच, देवरांनी सातत्याने तिथे काम केलेले आहे, एक मेट्रो पॉलिटिकल चेहरा म्हणून मिलिंद देवरा यांच्याकडे पाहिले जाते. दक्षिण मुंबईतील उच्चभ्रू वस्त्यांमध्ये त्यांचे नावदेखील आहे. कुलाबा, वरळी, लालबाग, परळ या भागांत त्यांनी मोठे काम केले आहे. अशातच महायुतीलाही एका चेहऱ्याची गरज आहे. त्यामुळे महायुतीतील घटक पक्ष मिलिंद देवरांकडे एक पर्याय म्हणून पाहात असल्याची माहिती मिळत आहे.*

### 'या' जागेसाठी केला शिवसेनेत प्रवेश

*दोनदा खासदार व नंतर दक्षिण मुंबईतून दोनदा पराभूत झालेले देवरा यंदाही याच जागेसाठी आग्रही आहेत. मात्र 10 वर्षांपासूनचे उद्धवसेनेचे विद्यमान खासदार अरविंद सावंत ही जागा सोडणार नाहीत. त्यामुळे महाविकास आघाडीत वाद निर्माण झाला आहे. याच कारणावरून देवरा यांनी शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. देवरा यांचा ओढा भाजपकडे होता. पण महायुतीत हा मतदारसंघ शिवसेनेकडे आहे. त्यामुळे भाजपच्या सल्ल्यानुसारच देवरा यांनी शिंदेसेनेचा 'पर्याय' स्वीकारल्याचे सांगितले जाते.*

# आमची निष्ठा देशासाठी, तर काहींची कुटुंबासाठी

## पंतप्रधान मोदींची विरोधकांवर टीका



प्रतिनिधी
नवी मुंबई

आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'अटल सेतू'सह तीस हजार कोटींच्या प्रकल्पांचे लोकार्पण नवी मुंबईत केले. या प्रकल्पांच्या उद्घाटनावेळी मोदी म्हणाले, "मुंबई तसंच मुंबई उपनगरातून येथे उपस्थित राहिलेल्या जनतेला माझा नमस्कार! अटल सेतू पुलाचा शिलान्यास करण्यासाठी मी जेव्हा 2014 साली मुंबईत आलो होतो. तेव्हा मी छत्रपती शिवाजी महाराजांना नमन करून सांगितलं होतं, की लिहून ठेवा देश बदलेल. देश पुढे जाईल. आजचा दिवस महाराष्ट्रसह विकसित भारतासाठी महत्त्वाचा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि मुंबादेवीला नमन करून सिद्धिविनायकाला प्रणाम करून मी अटल सेतू मुंबईकरांसाठी देशातील लोकांसाठी समर्पित करत आहे." या अगोदर सत्तेतील लोकांची निष्ठा देशाप्रती नाही तर फक्त आपले परिवार मोठे करण्यावर होती. आता आम्ही राजकारणाचा अर्थच बदलून टाकला असून आम्ही राष्ट्रकारणावर भर देत आहोत, असे मोदी म्हणाले.

कोरोना महामारीमध्येही मुंबई ट्रान्स हार्बर लिंकचं काम सुरू होतं. ही फार मोठी उपलब्धी आहे. देशात विकास होणार ही मोदीची गॅरंटी आहे. आमच्यासाठी प्रत्येक प्रोजेक्ट भारत नवनिर्माणाचं माध्यम आहे. आज अनेक प्रोजेक्टचं उद्घाटन, लोकार्पण झालं आहे. आज महाराष्ट्रात एकनाथ शिंदेंपासून अजित पवार यांच्या टीमचं हे काम आहे. मी त्यांचं अभिनंदन करतो. इतक्या मोठ्या संख्येनं महिला येथे आल्या आहेत. त्यांनी आशीर्वाद दिले आहेत. त्यापेक्षा मोठं सौभाग्य काय असू शकतं असंही पंतप्रधान यावेळी म्हणाले.

अटल सेतुसाठी वापरण्यात येणाऱ्या स्टील, इतर सामान त्यामध्ये चार हावडा ब्रिज व सहा स्टॅच्यू ऑफ लिबर्टी निर्माण झाले असते. हा ब्रिज बांधण्यासाठी जपानने जो सहयोग दिला आहे. त्यासाठी मी जपान सरकारचा विशेष आभारी आहे. जेव्हा माझ्यावर 2014 च्या निवडणुकीची जबाबदारी दिली होती. तेव्हा मी रायगड किल्ल्यावर गेलो होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीवर जाऊन मी काही क्षण घालवले होते. मागच्या दहा वर्षांमध्ये भारत बदलला आहे. याची चर्चा खूप होते असंही पंतप्रधान यावेळी म्हणाले. दहा वर्षांपूर्वी हजारो, करोडोंचे मेगा प्रोजेक्ट स्कॅमची चर्चा व्हायची. आज दहा वर्षात झालेल्या अनेक यशस्वी प्रोजेक्टची चर्चा होत आहे. मागच्या वर्षी बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग उद्घाटन झालं. नवी मुंबई विमानतळाचं काम जोरात सुरू आहे. मुंबईला लवकरच नवीन बुलेट ट्रेन मिळणार आहे, असंही ते यावेळी म्हणाले.

# 'अटल सेतू'सह तीस हजार कोटींच्या प्रकल्पांचे लोकार्पण



### २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उद्धाटन

## युवकांच्या सामर्थ्यावर देशाची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नाशिक :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत काळातील आजची तरुण पिढी नशीबवान आहे. या पिढीला वेगवेगळ्या संधी उपलब्ध आहेत. या पिढीला सामर्थ्यवान आणि कौशल्याधारित करण्यासाठी शासनाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या युवकांच्या सामर्थ्यावरच भारताची जगातील आर्थिक महासत्ता होण्याकडे वाटचाल सुरू आहे. अमृत काळातील पुढील 25 वर्षांच्या कालावधीत परिश्रम घेत तरुणांनी @२०४७ पर्यंत विकसित भारत घडवित इतिहास निर्माण करावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा विभाग व राज्य शासनातर्फे नाशिक येथे आजपासून सुरू झालेल्या २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उदघाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते तपोवन मैदानावर झाले. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय माहिती व प्रसारण, युवक कल्याण व क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री निसिथ प्रामाणिक, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास व पर्यटन मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, खासदार डॉ. सुभाष भामरे, खासदार हेमंत गोडसे, आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, नरेंद्र दराडे, किशोर दराडे, माणिकराव कोकाटे, दिलीप बोरसे, दिलीप बनकर, प्रा. देवयानी फरांदे, सरोज अहिरे, डॉ. राहुल आहेर, सीमा हिरे, नितीन पवार, ॲड. राहुल ढिकले आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्रात ८ लाख ३५ हजार कोटींची विकासकामे सुरू



**नवी मुंबई:** महाराष्ट्रात सर्वाधिक पायाभूत सुविधांचे प्रकल्प सुरु असून आपल्याकडून जे प्रस्ताव केंद्रात जातात, ते मंजूर होतात. महाराष्ट्राची विश्वासार्हता वाढत असून गुंतवणुकदारांचा देखील गुंतवणुकीसाठी प्रतिसाद वाढला आहे. राज्यात सुमारे ८ लाख ३५ हजार कोटी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील अडथळेही दूर झाले असून या मार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली असल्याची माहिती एकनाथ शिंदेंनी दिली.

**लोकसभा निवडणुकीनंतर भूकंप येणार**

आगामी लोकसभा निवडणुकीनंतर भूकंप येईल आणि आमचे विरोधक तो सहन करू शकणार नाहीत, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यासाठी वेळ देत असतात. पंतप्रधान मोदींना एवढे प्रेम देशात मिळते तेवढे प्रेम देशात कुणालाच मिळत नसेल. विरोधकांना हे खटकत असून त्यांच्या पोटात दुखते. आता अहंकारी लोकांचा अहंकार संपणार असल्याची टीकाही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केली. तसेच, अब की बार चारसौ पार ही आमचीही जबाबदारी आहे. तर राज्यातही अब की बार 45 पार, असा नवा नाराही एकनाथ शिंदेंनी यावेळी दिला.

### पंतप्रधान मोदींनी आज उद्धाटन केलेले प्रकल्प

- ऑरेंज गेट-मरिन ड्राईव्ह भूमिगत मार्गाचे भूमिपूजन
- वसई-विरारसाठी आता मुबलक पाणीपुरवठा
- नमो नारीसन्मान, मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण लेक लाडकी योजना
- शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू
- नवी मुंबईकरांसाठीची नवीन मेट्रोसेवा
- खारकोपर-उरण रेल्वे सेवा सुरू
- दिघा गाव रेल्वे स्टेशनचं लोकार्पण
- खार रोड-गोरेगाव रेल्वे सहावा मार्ग

### पंतप्रधानांना समजण्यासाठी अजित पवारांचे हिंदीतून भाषण



**नवी मुंबई:** तिसरी मुंबई रायगड जिल्ह्यात उभी राहणार, असे वक्तव्य आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. यावेळी पंतप्रधानांना राम मंदिराची प्रतिकृती भेट देण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संपूर्ण भाषण हे हिंदीतून केले असून या भाषणात त्यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक केले. अजित पवार म्हणाले, "आज मुंबईनंतर दुसरी आणि आता तिसरी मुंबई रायगड जिल्ह्यात तयार होत आहे. या तिसऱ्या मुंबईला अटल सेतूमुळे खूप मोठा फायदा होईल. रायगडपासून मुंबईला जाण्यासासाठी दोन ते अडीच तासाचा प्रवास फक्त 20 मिनिटात होणार आहे. यामुळे इंधन आणि पैशाची बचत होणार आहे.

### देशात 'मोदी राज' आलं म्हणून अटल सेतू होऊ शकला...



**नवी मुंबई:** आजच्या आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले विचार मांडले. देशात मोदी राज आलं म्हणून अटल सेतू होऊ शकला असं त्यांनी म्हटलं. फडणवीस म्हणाले, आजचा दिवस हा आपल्या सर्वांसाठी स्वप्नपुर्तीचा दिवस आहे. मला या गोष्टीची सर्वात जास्त खुशी आहे की अटल सेतूचं उद्धाटन पंतप्रधान मोदींच्या हस्ते होत आहे. याचं भूमिपुजन पंतप्रधानांनी केलं होतं आणि उद्धाटनंही त्यांच्याच हस्ते होत आहे. तसेच अटल सेतू यामुळं होऊ शकला कारण या देशात मोदी राज आलं. जर मोदी राज आलं नसतं तर अटल सेतू कधीही होऊ शकला नसता, असे फडणवीस बोलताना म्हणाले.

## २ हजार वर्षांपूर्वी गाडलं गेलेलं प्राचीन शहर जंगलात सापडलं

### अवशेषांमुळे उकललं गूढ



क्वेटो

ॲमेझॉनच्या पर्जन्यवनांमध्ये प्राचीन शहराचे अवशेष सापडले आहेत. जंगलांमध्ये डोंगराळ भागाजवळ शहराचे अवशेष आढळून आले. या ठिकाणी १० हजार लोक वास्तव्यास होते. तब्बल हजार वर्ष इथे लोक राहत होते. पुरातत्त्वशास्त्रज्ञांना सापडलेलं घर इक्वेडोरमध्ये आहे. शहराच्या अवशेषांवरुन पुरातत्त्वतज्ज्ञांनी काही अंदाज बांधले आहेत. सापडलेल्या शहरात प्रामुख्यानं शेतकरी वास्तव्यास होते. या शहरात रस्ते, बाजार, कालवे होते. लेझर सेन्सर टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी शहराचा अभ्यास केला. अँडीज पर्वतरांगेच्या पायथ्याशी असलेल्या मातींच्या ढिगाऱ्याखाली तज्ज्ञांना रस्त्यांचं जाळं सापडलं. यातील अनेक रस्ते सरळसोट होते. तीन मीटर खोलपर्यंत खोदकाम केल्यानंतर पायवाटा दिसून आल्या. मातीच्या ६ हजार ढिगाऱ्यांवर घरं आणि आवश्यक वास्तू उभारण्यात आल्या होत्या. शहरात असलेला सर्वात मोठा रस्ता ३३ फूट रुंदीचा होता. हा रस्ता १० ते १९ किलोमीटर लांबीचा होता. या भागात १० हजार जण वास्तव्यास होते, अशी माहिती फ्रॉन्सच्या राष्ट्रीय वैज्ञानिक संशोधन विभागाचे सहलेखक अँटोनी डोरिसन यांनी सांगितलं. संशोधकांच्या अंदाजानुसार इथे १५ ते ३० हजार जणांचं वास्तव्य असावं.

# जगाला हेवा वाटेल असा विकसित महाराष्ट्र घडवणार – मुख्यमंत्री शिंदे

प्रतिनिधी
विरार

राज्यातील सर्व समाज घटकांना न्याय देऊन राज्य विकासाकडे वाटचाल करत आहे. जगाला हेवा वाटावा असा विकसित महाराष्ट्र घडवणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. वि.वा. ठाकूर महाविद्यालय, विरार येथे १९ व्या जागतिक मराठी संमेलनाच्या उद्धाटनप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, आमदार सर्वश्री हितेंद्र ठाकूर, क्षितिज ठाकूर, श्रीनिवास वनगा, राजेश पाटील, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, वसई - विरार महापालिकेचे आयुक्त अनिल पवार, संमेलनाचे अध्यक्ष, जपानमधील मराठी आमदार योगेंद्र पुराणिक, जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, कामानिमित्त किंवा व्यवसायानिमित्त जगामध्ये कुठेही मराठी माणूस स्थायिक झाला तरी त्यांची नाळ ही मराठी भाषा व महाराष्ट्राशी जोडलेली असते याचे उत्तम उदाहरण म्हणजे जपानमधील मराठी भाषिक आमदार योगेंद्र पुराणिक हे आहेत. काळाबरोबर अनेक शब्दांचा संचय मराठी भाषेमध्ये झाला आहे. शेकडो वर्षांपासून मराठी भाषेची मुळं सामान्य जनतेच्या मनामध्ये घट्ट रुजलेली आहेत हे सर्वांना अभिमानास्पद आहे.



महाराष्ट्र संत, साहित्यिक, कवी, कलाकारांची भूमी असून या सर्व महान विभूतींनी मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी आपले अमूल्य योगदान दिले आहे. यामुळेच आपली मराठी भाषा भक्कम पायावर उभी असून जगभर मराठी भाषेचा प्रसार होतांना आपल्याला दिसत आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्र शासनाने पहिले विश्व मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते या संमेलनाला जगभरातील मराठी बंधू-भगिनीचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावर्षी देखील विश्व मराठी साहित्य संमेलन, वाशी येथे आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनामुळे मराठी भाषेचा प्रसार जगभर होण्यास मदत होणार आहे . गिरगाव चौपाटी येथे मराठी भाषा भवन उभारण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

### या दाढीमध्ये बऱ्याच लोकांची नाडी...

*मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ''दाढीवर फिरवित हात, त्यांनी केला संकल्प, ५० आमदारांचं पुर्नवसन, हाच यांचा प्रकल्प'', या रामदास फुटाणे यांच्या कवितेची आठवण आपल्या भाषणात करून दिली. मग ५० आमदारांच्या पुर्नवसनबाबत सांगताना ते म्हणाले, "हे सर्व करायला धाडस, हिंमत, जिगर लागतं. ५० आमदार, १३ खासदार आणि लाखो कार्यकर्ते जेव्हा एका विश्वासाने सोबत येतात. तेव्हा तो विश्वासदेखील सार्थ ठरवावा लागतो. त्याची काळजी घ्यायला लागते. फक्त 'मी आणि माझं कुटुंब' एवढंच पाहून चालत नाही. तर संपूर्ण महाराष्ट्र माझा परिवार आहे, असं मी मानतो.'' यानंतर एकनाथ शिंदे यांनीही काही ओळी वाचून दाखविल्या. ते म्हणाले, "ये है दाढी की किमया, दुष्टो का कर दिया सफाया.'' त्यानंतर सभागृहात आणि मंचावर एकच हशा पिकला. यानंतर ते म्हणाले मराठीतही सांगतो, "या दाढीमध्ये बऱ्याच लोकांची नाडी आहे...*

## लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच राम मंदिराचं उद्घाटन होतंय!



प्रतिनिधी
पुणे

राम मंदिराच्या उद्घाटनावरुन काँग्रेसवर टीका केली जाते. परंतु, राम मंदिराच्या उद्घाटनाला कुणाचाही विरोध नाही, फक्त लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून त्याचं उद्घाटन केलं जात आहे. मंदिराचे बांधकाम अर्धवट आहे. तरीही उद्घाटन केलं जात आहे, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी पुण्यात दिली.

पुण्यातील जुन्नर येथे भव्य शेतकरी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. तेथे शरद पवार यांनी पत्रकार परिषदेमध्ये विविध प्रश्नांची उत्तरे दिली. दिल्लीतील 'इंडिया' आघाडी बैठकीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, 'अनेक राज्याचे मुख्यमंत्री, महत्त्वाचे नेते बैठकीत सहभागी झाले. एकविचाराने निवडणुकीला सामोरे जाण्याचा विचार झालाय. जागा वाटपाचा निर्णय घेऊन काही वाद आहे, ते मिटवले जावे. याबाबत चर्चा झाली असून 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व खरगेंनी घ्यावं, अशी सूचना काही सहकाऱ्यांनी केली आहे आणि अनेकांचा त्यांना पाठिंबा आहे.' देशात भाजपकडून सुरु असलेल्या धार्मिक ध्रुवीकरणाच्या राजकारणावर पवार यांनी जोरदार टीका केली.

## जालन्यात 200 पिस्तूल घेण्यासाठी राजकीय नेत्यांकडून रसद

### भुजबळांचा खळबळजनक दावा



बीड

आज शनिवारी मंत्री छगन भुजबळ यांनी बीड येथील ओबीसी एल्गार मेळाव्यातून जालना आणि बीडमध्ये जाळपोळीच्या घटनेनंतर जालन्यात 200 पिस्तूल आल्या आहेत, असा दावा मंत्री छगन भुजबळांनी केला आहे. पिस्तूल घेण्यासाठी जिल्ह्यातील राजकीय नेत्यांनी रसद पूरवल्याचा दावा भुजबळांनी केला आहे.

भुजबळांच्या आरोपादरम्यान गेल्या महिन्याभरात कारवाई करत पोलिसांनी चौदा ते पंधरा पिस्तूल आणि तलावरी जप्त केल्या आहेत. भुजबळांनी सार्वजनिक सभेतून दोन महिन्यात जालन्यात 200 पिस्तूल आल्याचा खात्रीलायक दावा केल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवरून राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या अंतरवाली सराटी येथील आंदोलनात झालेल्या लाठीचार्जच्या घटनेनंतर बीड आणि जालन्यात मोठ्या प्रमाणात जळपोळ झाल्याच्या घटना घडल्या होत्या.

पान ३ वर

## सत्ता येऊ द्या, त्यांचे कंबरडेच मोडतो

### कल्याण दौऱ्यात उद्धव ठाकरेंचे शिंदेंना प्रत्तुत्तर

प्रतिनिधी
डोंबिवली

'मी व्यंगचित्रकाराचा मुलगा आहे, त्यामुळे चित्र कुठले रेखाटायचे, ते मला चांगले समजते. मी मोठ्या मनाचा नक्की आहे. मात्र तरीही गद्दारांना कधीही पुन्हा संधी देणार नाही. डोंबिवलीची शाखा पळवली मुंबईची शाखा तोडली आपली सत्ता येऊ द्या, त्यांचे आता कंबरडेच मोडतो', असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी डोंबिवलीत केले.

डोंबिवली मध्यवर्ती शाखेला देखील उद्धव ठाकरे यांनी भेट दिली. यानंतर त्यांनी संवाद साधला. यावेळी काँग्रेस राष्ट्रवादी ठाकरे गट महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलताना त्यांनी गद्दारांचे दिल्लीचे रस्ते बंद झाले. राहुल नार्वेकरांनी ज्या पद्धतीने निकाल दिला, पण त्यांनी जनतेत येऊन शिवसेना कोणाची हे विचारण्याची हिंमत दाखवावी, तुम्हाला कळेल शिवसेना कोणाची आहे. ते म्हणाले, कडेकोट बंदोबस्तात बसून शिवसेना कोणाची याचा निर्णय होऊ शकत नाही. या शब्दात त्यांनी नार्वेकर यांना सुनावले. थापा मारून लोकांची फसवणूक करणारी लोक आज मंदिरे साफ करतात चांगला आहे. त्यांना थोडं तरी पुण्य लागेल, असा टोला त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लगावला. नवी मुंबई विमानतळ आणि छत्रपती संभाजीनगरचे नाव आम्ही देण्याचे काम केले. मात्र तुम्ही आता विमानतळाला दि.बा.पाटील आणि छत्रपती संभाजीनगरच्या विमानतळाला छत्रपती संभाजीनगर विमानतळ, असे नाव देणार का? हे आम्हाला बघायचे आहे, असंही ते म्हणाले.

मराठी अक्रॉस मुंबई



# कोल्हापूर-गगनबावडा मार्गावर वाहतुकीत बदल होणार

**कोल्हापूर**

कोल्हापूर ते गगनबावडा (Kolhapur to Gaganbawda) मार्गावरुन होणारी अवजड वाहतूक प्रतिबंधित करण्यात येणार आहे. कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावर यांनी आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार 31 जानेवारी 2024 पर्यंत या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक सायंकाळी 6 ते सकाळी 10 या वेळेत पूर्णतः बंद करुन पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. तसेच सकाळी 10 ते सायंकाळी 6 या वेळेत फक्त अत्यावश्यक सेवा व प्रवासी वाहतूक सुरु ठेवण्यास परवानगी असेल, असे आदेशात म्हटले आहे.



1 फेब्रुवारी ते 25 एप्रिल 2024 या कालावधीत वाहतूक पूर्णपणे बंद

जड वाहतुकीस सकाळी 10 ते सायंकाळी 6 या वेळेत महामार्ग संपूर्ण बंद ठेवण्यात येणार आहे. 1 फेब्रुवारी ते 25 एप्रिल 2024 या कालावधीत वाहतूक पूर्णपणे बंद करुन अन्य मार्गाने वळविण्यात येणार आहे. वाहतुक सुरक्षा उपायोजनेद्वारे वाहतुक नियंत्रित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी दिले आहेत. कोल्हापूर -गगनबावडा-करुळ घाट हा रस्ता करुळ घाट मार्ग कोकणकडे जाणारा राष्ट्रीय महामार्ग आहे.

कोल्हापूर- गगनबावडा-करुळ घाट दुरुस्तीसाठी बंद राहणार

कोल्हापूर- गगनबावडा-करुळ घाट हा दुरुस्तीसाठी बंद राहणार आहे. कोल्हापूर- गगनबावडा मार्गावरील वाहतूक पर्यायी कोल्हापूर -दाजीपूर मार्गे कोकण-गोवा तसेच कोल्हापूर- कळे-बाजार भोगांव- पाचलमार्ग-लांजा राजापूर अशा मार्गाने कोकणकडे जाण्यास पर्यायी मार्ग आहे. करुळ घाटातून होणाऱ्या वाहतुकीसाठी कोल्हापूर-भोगावती-गैबी राधानगरी फोंडा तसेच निपाणी मुदाळ तिटटा- गैबी-राधानगरी फोंडा असा पर्यायी मार्ग आहे. राधानगरी ते फोंडा जाणारा रोड घनदाट जंगलातून असून अरुंद व धोकादायक वळणाचा घाट आहे.

असळजमधील डॉ. डी. वाय. पाटील साखर कारखान्याचा गळीत हंगाम सध्या सुरु असल्याने कारखान्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातून काही प्रमाणात ऊस येतो. ही ऊस वाहतूक करुळ घाट मार्गाने होत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून होणारी ऊस वाहतुक संबंधित कारखान्याकडून पूर्ण झाल्यानंतरच हा मार्ग बंद करणे योग्य ठरेल, असेही आदेशात म्हटले आहे.

करुळ घाट बंद केल्यास जे पर्यायी मार्ग सुचविलेले आहेत त्यामध्ये तळेरे-भुईबावडा- गगनबावडा-कळे-कोल्हापूर असा मार्ग प्रवासी वाहतुकीसाठी सुचविण्यात आला आहे. परंतु हा घाट अत्यंत अरुंद, तीव्र उतार व वळणाचा आहे. या मार्गाने फक्त हलक्या प्रवासी वाहनांनाच परवानगी असावी, अन्यथा अपघातांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता असल्याचेही आदेशात म्हटले आहे.

## अमित शाह यांच्या बहिणीचं मुंबईतल्या रुग्णालयात उपचारांदरम्यान निधन

**मुंबई**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची मोठी बहीण राजेश्वरीबेन शाह यांचं निधन झालं आहे. मुबईतल्या एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार चालू होते. उपचारांदरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. भाजपाच्या एक वरिष्ठ पदाधिकाऱ्याने याबाबतची माहिती दिली आहे. राजेश्वरीबेन यांच्या निधनाचं वृत्त कळताच अमित शाह यांनी त्यांचे आजचे नियोजित कार्यक्रम रद्द केले आहेत. राजेश्वरीबेन यांचं वय ६० वर्षे इतकं होतं. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या, त्यामुळे त्यांच्यावर मुंबईतल्या एका रुग्णालयात उपचार चालू होते. राजेश्वरीबेन यांचं पार्थिव अहमदाबादला नेलं जात असून सायंकाळी थलतेज स्मशानभूमीवर त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील.

अमित शाह हे आज सकाळपासून अहमदाबादेत आहेत. ते भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह मकर संक्रात साजरी करत असताना त्यांना बहिणीच्या निधनाचं वृत्त समजलं. त्यामुळे त्यांनी बनासकांटा आणि गांधीनगरमधील दोन नियोजित कार्यक्रम रद्द केले आहेत. अमित शाह हे बनासकांठामधील देवदार गावातील बनास डेअरीच्या वेगवेगळ्या योजनांचं उद्धाटन करणार होते. तर दुपारी गांधीनगरमध्ये राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयातील वेगवेगळ्या योजनांचं उद्धाटन करणार होते. परंतु, आता अमित शाह या कार्यक्रमांना जाणार नाहीत.

## थोडक्यात

### वेतन विसंगती सुधारण्याची तत्काळ अंमलबजावणी करा

**मुंबई:** वेतन विसंगती सुधारणा समिती २०२२ च्या अहवालाच्या आधारे क्रमांक सप्रवी/ उप प्रमुख लेखापाल (आस्था.२)/ आरजीसेल /१४, दि. २३.१०.२०२३ अन्वये परिपत्रक प्रस्तुत करण्यात आलेले आहे. परंतु प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या खात्याकडून सदर परिपत्रकाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब काल दि म्युनिसिपल युनियनचे रमाकांत बने यांनी अतिरिक्त पालिका आयुक्त( शहर) डॉ.आश्रिवनी जोशी यांच्या निदर्शनास आणून दिली डॉ अश्विनी जोशी यांनी तत्काळ अशोक रूपवते, प्रमुख लेखापाल (कोषागार ) यांना फोन करून, सदर परिपत्रकाची तत्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश मिलिन सावंत, सह आयुक्त (सा.प्र.) याना द्या असे जोशी मॅडम यांनी सांगितले असल्याचे बने यांनी सांगितले.

### 13,14 जानेवारीला रात्री मध्य रेल्वेचा मेगाब्लॉक

**मुंबई:** मध्य रेल्वे, मुंबई विभाग ठाणे ते कल्याण दरम्यान पाचव्या आणि सहाव्या लाईनसाठी १३ व १४ जानेवारी २०२४ रोजी विविध अभियांत्रिकी आणि देखभालीच्या कामांसाठी उपनगरीय विभागांवर रात्रीचा मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. १३.१.२०२४ रोजी रात्री ११.४० ते १४.१.२०२४ रोजी पहाटे ३.४० वाजेपर्यंत असेल त्यामुळे सहाव्या मार्गावर धावणाऱ्या अप मेल/एक्स्प्रेस गाड्या कल्याण/दिवा आणि विद्याविहार दरम्यान अप जलद मार्गावर वळवण्यात येतील आणि निर्धारित वेळेपेक्षा १० ते १५ मिनिटे उशिरा पोहोचतील. पाचव्या मार्गावर चालणाऱ्या डाऊन मेल/एक्स्प्रेस गाड्या विद्याविहार आणि दिवा/कल्याण दरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवल्या जातील आणि निर्धारित वेळेच्या १० ते १५ मिनिटे उशिरा पोहोचतील.

### विमान थांबवून आरोपीला अटक

**मुंबई:** महागडा मोबाइल कमी किंमतीत देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या एका आरोपीला मुलुंड पोलिसांनी अटक केली. विशेष म्हणजे आरोपी पुण्याहून विमानाने गोव्याला निघाला होता. मात्र माहिती मिळताच विमानतळावर पोहोचलेल्या पोलिसांनी उड्डाणाच्या तयारीत असलेले विमान थांबवून आरोपीला ताब्यात घेतले. गणेश भालेराव (२९) असे या आरोपीचे नाव असून तो पुण्यातील रहिवासी आहे. मुलुंड पोलीस पुणे विमानतळावर पोहोचले. विमान उड्डाण करण्याच्या तयारीतच होते. मात्र पोलिसांनी संबंधित अधिकाऱ्यांना आरोपीविषयी माहिती दिली आणि उड्डाणाच्या तयारीत असलेले विमान थांबविण्यात आले. त्यानंतर विमानात बसलेल्या आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

# 10 दिवसानंतर मुंबईत पुन्हा 'क्लिनअप मार्शल' होणार कार्यान्वित

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबईत सार्वजनिक ठिकाणी कचरा, डेब्रिज टाकणा-यांवर पुन्हा आता क्लिनअप मार्शलची नजर राहणार आहे. यासाठी मुंबई महापालिका प्रत्येक व्रॉर्डात क्लिनअप मार्शलची नियुक्ती करणार आहे. प्रशासकांची मंजुरी मिळाल्याने येत्या १० दिवसांत याची अंमलबजावणी सुरु केली जाणार आहे. हे क्लीनअप मार्शल सार्वजनिक ठिकाणी-उघड्यावर थुंकणे, नैसर्गिक विधी करणे, कचरा- अस्वच्छता करणाऱ्यावर कारवाई करून दंड वसूल करणार आहेत. यामध्ये अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर २०० रुपयांपासून १ हजारांपर्यंत

### कचरा टाकल्यास होणार कडक कारवाई



कारवाई करणार आहेत.

मुंबईत गेल्या दोन वर्षांपूर्वी 'क्लीनअप मार्शल' पुरवणाऱ्या संस्थेच्या कंत्राटाची मुदत संपल्याने शहरात 'क्लीनअप' मार्शल नाहीत. त्यामुळे स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होत आहे. यासाठी मुंबईत स्वच्छता दूत नेमण्याचा निर्णयही याआधी घेण्यात आला आहे.

स्वच्छतेसंदर्भात व्यापक मोहीम राबवण्यासाठी 'स्वच्छता दूत' नेमण्यात येणार असून स्वच्छतेबाबत जनजागृती, प्रशासनाला माहिती देऊन स्वच्छतेचे काम करणे, सोसायट्यांमध्ये कचरा वर्गिकरणाबाबत नजर ठेवणे अशी कामे केली जाणार आहेत. तर 'क्लीनअप मार्शल'कडून अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. यामध्ये आकारलेल्या दंडाची अर्धी रक्कम संबंधित कंत्राटदाराला तर अर्धी रक्कम पालिकेला मिळणार असल्याने महसूलही मिळणार असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. येत्या १० दिवसानंतर क्लिनमार्शल नियुक्ती होऊन अंमलबजावणी सुरु होणार असल्याचे सांगण्यात आले,

दरम्यान, 'क्लिन अप मार्शल'कडून दंड वसूल करताना नियम मोडणाऱ्यांसोबत वादावादीचे प्रसंग यापूर्वी घडले आहेत. दंड वसूल करताना भ्रष्टाचार होत असल्याचा आरोपही झाले आहेत. कोरोना काळात 'मास्क न वापरणाऱ्यांकडून दंड घेताना अनेक आरोप करण्यात आले होते. त्याबाबतच्या तक्रारीही नोंद झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर दंड घेण्याची सुविधा ऑनलाइन केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# बोरिवली जिजाऊ चौकाचे देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण



**प्रतिनिधी**
**मुंबई**

बोरिवली (पूर्व), मागाठाणे येथील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील मागाठाणे (दत्तपाडा) ब्रिज खाली खासदार गोपाळ शेट्टी यांच्या संकल्पनेतून व खासदार निधीतून राजमाता जिजाऊ चौकाचे व वाहतूक बेटाचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर तेथे राजमाता जिजाऊ व शिवबाळ यांचे दुतर्फा शिल्प व वाहतूक बेट तयार करण्यात आले आहे त्याचे लोकार्पण राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा मुंबई अध्यक्ष आमदार अँड. आशिष शेलार यांच्या हस्ते गुरूवारी रात्री संपन्न झाले.

यावेळी आमदार प्रवीण दरेकर,आमदार योगेश सागर,आमदार मनीषा चौधरी, आमदार सुनील राणे उपस्थित होते. जिजाऊ चौक आणि वाहतूक बेटाच्या आयोजना बद्दल उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी खासदार गोपाळ शेट्टी यांचे कौतूक केले. त्यांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असून त्यांनी बोरिवलीच्या वैभवात आणखी भर घातली आहे. असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

याच कार्यक्रमात जिजाऊ आणि शिवबा यांचे कलादालन यांचाही शुभारंभ करण्यात आला. पुढील तीन दिवस हे कलादालन सर्व नागरिकांसाठी खुले राहणार आहे.उद्धाटन सोहोळ्या पूर्वी अनेक शिवकालीन सांस्कृतिक कार्यक्रम आणि आणि शिवकालीन प्रात्यक्षिकांसह इतिहास जागा केला गेला. याच कार्यक्रमात अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते महेश कोठारे, प्रदीप कबरे, इतिहास अभ्यासक रविराज पराडकर, निवेदिका, लेखिका डॉ. सुचिता पाटील यांचाही सत्कार करण्यात आला.

उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष गणेश खणकर, महासचिव दिलीप पंडित, बाबा सिंह, निखील व्यास, उपाध्यक्ष महेश राऊत, सचिव दीपक पाटणेकर, शरद साटम, गणेश बारे, नितीन प्रधान, राजेश भट, सुनील मोहिते आणि कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले. या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा सन्मान खासदार गोपाळ शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.

# आशियाई चित्रपट महोत्सवात मराठवाड्याचा मुक्तिसंग्राम!

### शनिवारी सिटीलाईट सिनेमा येथे खास स्क्रिनिंग

**प्रतिनिधी**
**मुंबई**

निझामाच्या क्रूर रझाकारांपासून मराठवाड्याच्या मुक्तिसाठी लढा देणाऱ्या शूरवीर स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या धगधगत्या संघर्षाबरोबरच मराठवाड्याच्या मातीचा झळाळता गौरवास्पद इतिहास मांडणारा नाट्य माहितीपट आशियाई चित्रपट महोत्सवात सादर केला जाणार आहे.

या नाट्य माहितीपटाचे खास स्क्रिनिंग शनिवारी 13 जानेवारी रोजी, दुपारी १२ वाजता माहिम येथील सिटीलाईट सिनेमा येथे करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने मराठवाड्याचा मुक्तिसंग्राम प्रथमच मोठ्या पडद्यावर झळकणार आहे.

राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या`मुक्तिसंग्राम: कथा मराठवाड्याच्या संघर्षाची' या नाट्य माहितीपटाची निर्मिती सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने केली आहे.

तर प्रसिद्ध दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी या माहितीपटाचे दिग्दर्शन केले आहे. अजय पुरकर, समीर धर्माधिकारी, आदिनाथ कोठारे, समीर विद्वांस, विक्रम गायकवाड, स्मिता शेवाळे अशा मराठी चित्रपटसृष्टीतील मान्यवर कलाकारांनी या माहितीपटात भूमिका साकारली आहे.

सिलेक्टेड करस्पॉन्डन्स ऑफ सरदार वल्लभभाई पटेल, हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा आदी पुस्तकांचा संदर्भ घेत माहितीपटाची संहिता लिहीण्यात आली आहे.

# स्वच्छतेच्या कामासाठीचे बिल मंजूर करण्यासाठी लाच

**प्रतिनिधी**
**मुंबई**

स्वच्छता कामाचे बिल मंजूर करण्यासाठी कंत्रादारांकडून १० हजार रुपयांची लाच घेताना पालिकेच्या एल वार्डातील घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कनिष्ठ आवेक्षक शिरिष दगडखैर व मुकादम नितिन माणिक साबळे यांना लाचलुचपत खात्याच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून रंगेहात पकडले. त्यामुळे एल वार्ड परिसरात खळबळ उडाली आहे, तर

### मुकादमासह अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

अधिकाऱ्यांच्या पायाखालील वाळू सरकली आहे, मात्र या घटनेमुळे आता कंत्रादाटरांची थकीत बिल वसुली रखडण्याची शक्यता वाढली आहे.

पालिकेच्या एल वार्ड कुर्ला भागात पालिकेने स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत सफाई काम कंत्राटदार विनोद सोनकांबळे यांचे बिल मंजूर करण्यासाठी एल विभागातील घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कनिष्ठ आवेक्षक शिरिष दगडखैर व मुकादम नितिन माणिक साबळे यांनी विनोद सोनकांबळे यांच्याकडे १२ हजार रुपयांची लाच मागितली, मात्र विनोद सोनकांबळे यांनी १२ हजार रुपयांऐवजी १० हजार रुपये देण्याबाबत तडजोड केली. त्यानंतर विनोद सोनकांबळे यांनी याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार, लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचला होता.

# कांद्याची भुकटी करण्याचा प्रकल्प शेतकरी उत्पादक कंपनी मार्फतच - धनंजय मुंडे

**प्रतिनिधी**
**मुंबई**

निसर्गाचा लहरीपणा आणि दरातील चढ उतार यापासून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी स्मार्ट प्रकल्पांतर्गत कांद्याची भुकटी करण्याचा प्रकल्प शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत राबविण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.



याबाबत नाशिक जिल्ह्यातील माजी विधान परिषद सदस्य जयंतराव जाधव यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे बैठकीचे मागणी केली होती त्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला निसर्गाच्या लहरीपणामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होते तसेच कांदा निर्यातीबाबतच्या धोरणात फेरबदल केल्यानंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागते काही वेळा शेतकरी कांदा फेकून देतात. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात शेतकरी उत्पादक कंपनीकडून डीहायड्रेशन प्रोजेक्ट केल्यास कांद्याची भुकटी करून शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळू शकतो. त्यामुळे अशा प्रकारचा पथदर्शी प्रकल्प राबवून कांदा उत्पादकांना दिलासा देण्याची मागणी जाधव यांनी शासनाकडे केली होती.

# 26 जानेवारी आणि राम मंदिर प्राणप्रतिष्ठेच्या अनुषंगाने देशातील सुरक्षा यंत्रणा सज्ज

### जीआरपी, आरपीएफ, बॉम्ब स्क्वॉड, वैद्यकीय पथकांचे 'मॉक ड्रिल'

**प्रतिनिधी**
**मुंबई**

जीआरपी कुर्ला, टिळक नगर पोलीस, QRT, डॉग स्क्वॉड, बॉम्ब स्क्वॉड, वैद्यकीय पथक आदींच्या संयुक्तविधमाणे २६ जानेवारी प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने एलटीटी स्टेशन येथे दहशतवादी कारवाया इ. संदर्भात आणि राम मंदिर उभारणीच्या संदर्भात संयुक्त मॉक ड्रिलचे प्रात्यक्षिक सादर करून देशातील सुरक्षा यंत्रणा सज्ज असल्याचे दाखविण्यात आले.



बुधवार १० जानेवारीला सकाळी 11:58 च्या सुमारास LTT स्टेशनच्या जुन्या वेटिंग हॉलमध्ये GRP, लोहमार्ग पोलिस आयुक्त, शहर पोलिस सहाय्यक उपायुक्त, RPF LTT उपनिरीक्षक रवींद्र शर्मा, AKM, पिस्तूल, WT, यांच्या मार्गदर्शनाखाली HHMD सह श्वान , मॉक ड्रिल आयोजित केले गेले. जीआरपी कुर्लाचे वरिष्ठ पी.आय. शार्दुल यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या मॉक ड्रीलमध्ये आरपीएफ जीआरपी कर्मचारी व अधिकारी, शस्त्रे असलेले पुरुष व महिला, बीडीडीएस टीम, क्यूआरटी टीम, १०८ रुग्णवाहिका वैद्यकीय पथक आणि आरपीएफ डॉग स्क्वाड, एचसी भाऊ श्वान रुडी आणि डॉग स्क्वाड जीआरपी सोबत खालीलप्रमाणे लोहमार्ग, आरपीएफ, शहर पोलीस, क्यूआरटी टीमचे एकूण ४० कर्मचारी उपस्थित होते, या मॉक ड्रील दरम्यान, 2 सशस्त्र दहशतवाद्यांना संपवण्याचे प्रात्यक्षिक क्यूआरटीने केले.

२ ओलिस प्रवाशांची सुटका करण्यात आली, त्यांची बीडीडीएस, श्वान पथकाने तपासणी करून वैद्यकीय उपचार केले. शहर पोलिसांनी दहशतवाद्यांचे सांकेतिक मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी रुग्णवाहिकेत नेले. मॉक ड्रीलनंतर अशा प्रकारची दहशतवादी कारवाया घडल्यास कोणत्या प्रकारचे पूर्वनियोजन, सुरक्षा व्यवस्था, घटनेची वेळ समजून घेणे आदींबाबत संपूर्ण टीमचे डीब्रीफ करण्यात आले, त्यानंतर मॉक ड्रील रॅली काढण्यात आली. संपूर्ण स्टेशन परिसरात मॉक ड्रीलची प्रात्यक्षिक सुमारे १ वाजेपर्यंत करण्यात आले. या मॉक ड्रील दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडली नाही.



*मुंबई : स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त सह आयुक्त (करनिर्धारण व संकलन) सुनील धामणे यांनी महापौर दालनातील स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस काल पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी महानगरपालिका सचिव (प्रभारी) संगीता शर्मा, उप सचिव मनोज कांबळे उपस्थित होते.*

# राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त पोलिस उपायुक्त स्मिता पाटील यांचा खा. शेट्टी यांच्या हस्ते सत्कार

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त स्त्री शक्तीचा सन्मान करण्याची परंपरा पुढे नेत उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टी यांच्या हस्ते परिमंडळ १२ च्या पोलिस उपायुक्त स्मिता पाटील यांचा सत्कार काल सकाळी सत्कार करण्यात आला.



या वेळी स्थानिक आमदार मनीषा ताई चौधरी यांच्यासह दहिसर येथील शैलेंद्र नगर येथील डीसीपी कार्यालयात पोहोचून खा. गोपाळ शेट्टी यांनी डीसीपी स्मिता पाटील यांचा शाल, राजमाता जिजाऊंचे प्रेरणादायी चित्र आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव केला.

खा. गोपाळ शेट्टी यांनी डीसीपी स्मिता पाटील यांच्या कार्यपद्धतीबद्दल आणि प्रामाणिकपणाबद्दल समाधान व्यक्त केले आणि त्यांचे अभिनंदन केले. तसेच परिमंडळ १२ सुरक्षित ठेवण्यासाठी आणि गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी दहिसरच्या आमदार मनीषाताई चौधरी, महिला मोर्चा अध्यक्षा योगिता पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष अमर शहा यांच्यासह इतर पदाधिकारी ही उपस्थित होते.

# सरकारने विधान भवनाजवळ राजमाता जिजाऊ यांचा पुतळा उभारावा

### शिक्षकांतर्फे राजमाता जिजाऊ जयंती संपन्न

**प्रतिनिधी**
**मुंबई**

वीरमाता जिजाऊंना आजच्या महिलांनी आदर्श माता म्हणून स्वीकारले पाहिजे व आपल्या मुलांना वीर आणि मानवतावादी नागरिक म्हणून संगोपन केले पाहिजे. त्याच बरोबर विधान भवनाच्या सावलीत माता जिजाऊ यांचा भव्य पुतळा महाराष्ट्र सरकारने उभारावा अशी विनंती ओ.बी.सी चे तेलुगू नेते बोगा सुदर्शन पद्मशाली यांनी आपल्या भाषणात केली.

स्वराज्याचा पाया रचणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जीजाऊ यांची ४२६ वी जयंती महानगरपालिका शिक्षकांनी व तेलुगू मुंबईकरांनी साजरी केली. शुक्रवारी सकाळी भायखळा येथील राणीबाग मधील मातृमूर्ती जीजाऊ पुतळ्याला जेष्ठ शिक्षक अर्जुन चौगुले सर यानी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमात तेलुगु "सृष्टी मीडिया" च्या संपादक चिंतला लक्ष्मण पद्मशाली, कुणबी नारायण, इंदरापू श्रीनिवास बेस्ता, गायक भीमरत्न मालाजी, मंदा राजू महाराज, ज्येष्ठ शिक्षिक संजय बागडी, अमोल सोलंकी, मूलनिवासी मालाजी आदींनी सहभाग घेतला व त्यांना जिजाऊंना मानवंदना दिली.

# चोरट्यांनी एटीएम चोरण्याच्या नादात जाळले तब्बल 21 लाख

**डोंबिवली**

गेल्या काही दिवसांपासून डोंबिवलीत गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहेत. पोलिसांकडून सातत्याने प्रयत्न करुनही गुन्हेगारीच्या घटना घडत आहेत. अशातच डोंबिवलीत एटीएम फोडण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे चोरट्यांना हा प्रयत्न फसला आहे. मात्र चोरट्यांच्या एका चुकीमुळे एटीएममधील 21 लाखांची रोकड जळून खाक झाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरु केला आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

डोंबिवलीतील गरीबाचापाडा येथे हा सगळा धक्कादायक प्रकार घडला आहे. गरीबाचापाडा इथल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम मशीनमध्ये चोरट्यांनी चोरीचा अयशस्वी प्रयत्न केला. चोरट्यांनी गॅस कटरचा वापर करुन एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र गॅस कटर वापरल्याने एटीएममधील 21 लाखांची रोकड जळून खाक झाली. त्यामुळे चोरट्यांच्या हाती काहीच लागलं आहे. शेवटी पोलिसांच्या तावडीत सापडू नये यासाठी चोरट्यांनी थेट एटीएममध्ये लावलेल्या सीसीटीव्हीचा डीव्हीआर लंपास केला आहे. घटनेची माहिती मिळताच विष्णुनगर पोलीस घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी याप्रकरणाची नोंद करुन तपास सुरु केला आहे.

## संपादकीय

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रशासनाचे भविष्य

उत्पत्तीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता (जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्स), विस्तृत भाषा प्रारूप आणि कृत्रिम सामान्य बुद्धिमत्ता यांच्या व्यापक प्रसारामुळे त्यासाठीच्या प्रयत्नांवर व तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिक स्तरावर स्पर्धा सुरू झाली आहे. या तंत्रज्ञानाला बळ देणाऱ्या पुरवठा साखळीला विशेषतः सेमीकंडक्टर आणि ग्राफिक प्रक्रिया युनिट (जीपीयू)च्या संरक्षणासाठी लोकशाही जगतातील धोरणकर्त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या चित्राच्या पार्श्वभूमीवर भारताने कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक जागतिक भागीदारी (जीपीएआय) चे नेतृत्व केले आणि डिसेंबर महिन्यात नवी दिल्ली येथे शिखर परिषदेचे यजमानपद भूषवले. भारताने गेल्या वर्षी म्हणजे २०२३ च्या सप्टेंबर महिन्यात जी-२० शिखर परिषदेचेही यजमानपद भूषवले. एक संघटना म्हणून जी-२० कृत्रिम बुद्धिमत्ता व अन्य संबंधित तंत्रज्ञानासाठी न्याय्य मानकांचे नियमन करण्यासाठी आणि अंमलबजावणी करण्यासाठी आघाडीवर आहे. सुरक्षित व विश्वासार्ह कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करण्याच्या दृष्टीने आणि त्याचा प्रभाव कायम राखण्याची सामूहिक जबाबदारी निश्चित करण्याच्या घोषणेने जी-२० आणि जीपीएआय या दोन्ही शिखर परिषदांचा समारोप झाला. असे असले, तरी संघटनेच्या सदस्य देशांनी कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित नैतिक प्रश्नही हाताळावयाला हवेत. या दृष्टीने पुढे येणारा एक प्रकल्प म्हणजे, कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित डिजिटल विभाजन. सुरक्षित व विश्वासार्ह कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करण्याच्या दृष्टीने आणि त्याचा प्रभाव कायम राखण्याची सामूहिक जबाबदारी निश्चित करण्याच्या घोषणेने जी-२० आणि जीपीएआय या दोन्ही शिखर परिषदांचा समारोप झाला. असे असले, तरी संघटनेच्या सदस्य देशांनी कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित नैतिक प्रश्नही हाताळावयाला हवेत. कृत्रिम बुद्धिमत्ता व नव्या तंत्रज्ञानाचे नियमन करण्यात आले नाही, तर त्याचे वेगवेगळे प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. या परिणामांमुळे विषमता, खासगीपणाचा अभाव आणि नैतिकतेचे उल्लंघन अशा गोष्टी होऊ शकतात. लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या औद्योगिक क्रांतीच्या इतिहासाची जाण ठेवून आणि नैतिक चिंतांना प्राधान्य देऊन जी-२० व जीपीएआय गटांचे सदस्य देश योग्य नेतृत्व व नियमनाच्या अभावामुळे होणारे प्रतिकूल परिणाम कमी करू शकतील. जी-२० चा प्रभाव लक्षणीय असला आणि जीपीएआयच्या सदस्यांकडे तांत्रिक कौशल्य असले, तरीही बऱ्याच सदस्य देशांना डिजिटल विभाजन, विशेषतः अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे असमान वितरण आणि त्याचे लाभ अशा प्रकारच्या समस्यांशी सामना करावा लागत आहे. प्रामुख्याने विकसित बाजारपेठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास जसजसा होऊ लागतो, तसतसे हे विभाजन अधिकाधिक वाढत जाते; तसेच हे देश आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे संशोधन व विकास (आर अँड डी) करणारे अन्य विकसनशील देश यांच्यातील दरी वाढत जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता इंडेक्स फंड २०२३ अनुसार, २०१३-२२ या कालावधीत भारत, जपान, ब्रिटन व जी-२० संघटनेतील बहुसंख्य देशांनी कृत्रिम बुद्धिमत्तेत केलेल्या गुंतवणुकीने अमेरिकेला (२५० अब्ज डॉलर) मागे टाकले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व विकासासंबंधीच्या असमान उपलब्धतेमुळे आर्थिक धोके, राजकीय अस्थिरता आणि तडजोड केलेल्या सार्वभौमत्वासह अविकसित देशांवर टोकाचे परिणाम दिसण्याची शक्यता आहे. यामुळे लष्करी व आर्थिक उद्दिष्टांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरात विकसित देशांना लक्षणीय यश मिळत असल्याने जागतिक सत्ता संतुलन बिघडू शकते. विकसनशील देशांच्या आर्थिक प्रगतीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक विषमतेला कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ लाभून अस्थिरता व राजकीय संघर्ष नक्कीच उभा राहू शकतो. लष्करी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या एकीकरणामुळे तंत्रज्ञानाच्या विषमतेमुळे मर्यादित कृत्रिम बुद्धिमत्ता असलेल्या देशांची सुरक्षा व सार्वभौमत्व धोक्यात येऊ शकते. त्यामुळे आता भू-राजकीय वर्चस्वापेक्षा सामाजिक सुधारणेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तातडीचा झाला आहे. जी-२० चा प्रभाव लक्षणीय असला आणि जीपीएआयच्या सदस्यांकडे तांत्रिक कौशल्य असले, तरीही बऱ्याच सदस्य देशांना डिजिटल विभाजन, विशेषतः अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे असमान वितरण आणि त्याचे लाभ अशा प्रकारच्या समस्यांशी सामना करावा लागत आहे. सदस्य देशांमध्ये वैविध्य असलेल्या आणि आर्थिक प्रभाव असलेल्या जीपीएआय आणि जी-२० संघटनेचा नवनवी आव्हाने पेलण्याचा दृष्टिकोन निराळा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता व जबाबदार तंत्रज्ञानाच्या योग्य व समान उपलब्धतेचा पुरस्कार करताना संबंधित सदस्य देश डिजिटल विभाजन कमी करण्यात मदत करू शकतात आणि भू-राजकीय लाभासाठी किंवा सशस्त्रीकरणासाठी वापर करण्याऐवजी कृत्रिम बुद्धिमत्तेचा लाभ सर्व देशांना मिळावा, याची खातरजमा करू शकतात. सध्या सुरू असलेल्या घडामोडींमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व संबंधित तंत्रज्ञान ही आजच्या जगाची नवी रीत बनत आहे. या पार्श्वभूमीवर अल्प व मध्यम उत्पन्न गटांतील देशांना अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाची न्याय्य उपलब्धता मिळू शकते. त्यामुळे त्यांना समान संधीही निर्माण होऊ शकते. विकसनशील देशांचे स्थैर्य, सुरक्षा आणि सार्वभौमत्व यांची निश्चिती करताना मानवतेच्या हितासाठी जी-२० संघटनेने कृत्रिम बुद्धिमत्तेचा पुरस्कार करायला हवा. नवी दिल्ली जी-२० नेत्यांचा जाहीरनामा व नवी दिल्ली जीपीएआय जाहीरनामा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा आराखडा, जागतिक डिजिटल पायाभूत सुविधा रिपॉझिटरी आणि वन फ्युचर अलायन्स (ओएफए) हा स्वयंसेवी उपक्रम यांनी निश्चित केलेली धोरणात्मक दिशा ही सर्वांच्या हितासाठी नव्या तंत्रज्ञानाचा व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या उपक्रमांमुळे डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या वृद्धीला विशेषतः नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या अल्प व मध्यम उत्पन्न असलेल्या देशांच्या गटाला प्रोत्साहन मिळेल. जी-२० देशांचा डेटा गॅप्स इनिशिएटिव्ह ३ (डीजीआय-३) विकसनशील देशांना हवामान बदलासारख्या क्षेत्रात सुलभपणे वापर करण्यायोग्य ओपन डेटा सेटसह आपले कृत्रिम बुद्धिमत्ता प्रारूप विकसित करण्यास मदत करील. याशिवाय गृहस्तरावरील माहिती, फिन्टेक व आर्थिक सहभाग आणि खासगी डेटा स्रोताची उपलब्धता व प्रशासकीय डेटा व डेटा शेअरिंग यासाठीही मदत करील. अखेरीस जीपीएआय आणि जी-२० ची भूमिका कृत्रिम बुद्धिमत्ता व संबंधित तंत्रज्ञानांचा हत्यारासारखा वापर केला जाऊ नये यासाठी आणि तंत्रज्ञानाच्या समान उपलब्धतेची निश्चिती होण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. तंत्रज्ञान जसजसे विकसित होत जाईल, तसतसे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सर्वांच्या हितासाठीच व्हावा, या दृष्टीने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा धोरण, जागतिक सहकार्य आणि सहयोग अधिकाधिक गरजेचे होत जाईल. जागतिक सुरक्षेचे रक्षण करणाऱ्या आणि पारदर्शकता, उत्तरदायित्व व जबाबदार निर्णयक्षमतेचे रक्षण करणाऱ्या नैतिक तत्त्वांवर भर देऊन सदस्य देश भविष्याला आकार देऊ शकतात. या बाबतीत कृत्रिम बुद्धिमत्ता लोकांचे जीवन समृद्ध करू शकते.

# व्यापारी जहाजांवर हौथींचे ड्रोन हल्ले

अरबी समुद्रात एमव्ही केम प्लूटो या लाइबेरियन ध्वज असलेल्या रासायनिक टँकरवर 23 डिसेंबर रोजी ड्रोन हल्ला झाल्याचा संशय आहे. यानंतर एकाच दिवसात येमेनमधल्या हौथी अतिरेक्यांनी गॅबॉन ध्वज असलेल्या क्रूड ऑइल टँकरवरही हल्ला केला, असे म्हटले जाते. साई बाबा, केम प्लुटो हे टँकर भारताच्या दिशेने जात असताना सशस्त्र ड्रोनने त्यांना धडक दिली. अलीकडच्या काळात व्यावसायिक जहाजांवर हौथी अतिरेक्यांनी केलेला हा 15 वा हल्ला आहे.

या दुहेरी हल्ल्यांमुळे हिंदी महासागराच्या क्षेत्रात अस्वस्थता पसरली आहे. हिंदी महासागरातील सागरी दले ही समुद्री चाचांशी लढण्यात पारंगत असली तरी नागरी जहाजावरील ड्रोन हल्ल्यांना सामोरे जाण्याचा त्यांना फारसा अनुभव नाही. या ड्रोन हल्ल्यांमध्ये हौथी अतिरेक्यांनी वापरलेले डावपेच बऱ्याच जणांसाठी नवे आहेत. त्यातच या हल्ल्यांची जबाबदारी न घेणे हा मुद्दाही चिंताजनक आहे. केम प्लुटोवरील हल्ल्याची जबाबदारी हौथी किंवा इतर कोणत्याही गटाने स्वीकारलेली नाही. हा हल्ला भारताजवळील जलक्षेत्रात झालेला असल्याने चिंता वाढली आहे.

केम प्लुटोवरील हल्ल्याची जबाबदारी हौथी किंवा इतर कोणत्याही गटाने स्वीकारलेली नाही. हा हल्ला भारताजवळील जलक्षेत्रात झालेला असल्याने चिंता वाढली आहे.

भारतीय नौदल नेहमीच अशा ड्रोन हल्ल्यांवर नजर ठेवून असते. हे हल्ले नेमके कुठून होतात यावरही त्यांचे लक्ष असते. केम प्लूटोमधून जप्त केलेल्या ढिगाऱ्याच्या प्राथमिक तपासणीत इराणी शाहेद 136 लॉइटिंग दारूगोळा वापरल्याचे संकेत मिळाले आहेत. शाहेद 136 हा रशियन गेरान-2 एक्सपेंडेबल ड्रोनचाच एक प्रकार आहे. त्याची रेंज 2,500 किमी आणि 50 किलो वॉरहेड इतकी आहे. 2020 मध्ये येमेनी गृहयुद्धात हौथींनी या ड्रोनचा वापर केल्याचा संशय आहे. केम प्लूटोवरील हल्ला इराणमधून झाला असावा असे म्हणणाऱ्या अमेरिकेला मात्र तपासणीमधले निष्कर्ष पटतीलच असे नाही. इराण नियमितपणे त्याच्या किनारपट्टीपासून शेकडो मैल दूर असलेल्या व्यावसायिक जहाजांवर हल्ले करतो आहे, असा अमेरिकेचा दावा आहे. पण याला इतर तज्ज्ञांचा दुजोरा नाही. इराणला अनुकूल देश असलेल्या भारताजवळील केम प्लुटोच्या पाण्यावर हल्ला करून इराण काही साध्य करण्याची शक्यता नाही, असे अनेक भारतीय निरीक्षकांना वाटते.

म्हणूनच या हल्ल्याचा स्रोत शोधताना भारताचे राजकीय आणि लष्करी नेतृत्व अतिशय सावध राहिले. अलीकडेच INS इंफाळ ही भारताची नवीनतम मार्गदर्शित क्षेपणास्त्र नाशक नौका कार्यान्वित करण्यात आली. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संभाव्य गुन्हेगारांचे नाव न घेता हल्लेखोरांना शोधण्याचा सरकारचा संकल्प अधोरेखित केला. आम्ही त्यांना समुद्राच्या तळातून शोधून काढू आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करू, असे राजनाथ सिंह यांनी ठामपणे सांगितले.

संरक्षण मंत्र्यांच्या या विधानाने भारतीय जहाजांना थोडासा आत्मविश्वास मिळू शकतो परंतु यामुळे समुद्रात ड्रोनचा सामना करण्याच्या अडचणी मात्र कमी होत नाहीत. यातली मुख्य गुंतागुंत म्हणजे रणनीतीच्या दृष्टीने प्रतिकार करण्याची अपुरी क्षमता. हवाई ड्रोन हल्ल्यांपासून बचावासाठी जॅमिंग आणि स्पूफिंग हे एकमेव तंत्रज्ञान आहे. पण व्यापारी जहाजे या तंत्रज्ञानाचा वापर करू शकत नाहीत. अनेक अँटी-ड्रोन तंत्रे विशिष्ट हवामान परिस्थितीत चांगले काम करू शकत नाहीत. त्यामुळे अडचणी वाढल्या आहेत. जॅमिंग तंत्रज्ञानात विशेष समस्या आहेत कारण त्यात मैत्रीपूर्ण संप्रेषण प्रणालींमध्ये हस्तक्षेप करण्याची क्षमता आहे. ड्रोन कंट्रोल सिस्टीमला गोंधळात टाकण्यासाठी स्पूफिंग तंत्रज्ञान उपयुक्त आहे पण तेदेखील काहीवेळा चुकीच्या लक्ष्याचा वेध घेऊ शकते. लेसर प्रणाली आणि उच्च-शक्तीची मायक्रोवेव्ह शस्त्रे यासारखी ऊर्जा शस्त्रे सशस्त्र ड्रोनचा सामना करण्यासाठी अधिक प्रभावी आहेत. परंतु हे तंत्रज्ञान महाग आहे आणि अनेक प्रादेशिक नौदले ते मिळवू शकत नाहीत.



अमेरिकेच्या नेतृत्वाखालील संयुक्त सागरी दलामध्ये सामील होणे हा भारत आणि इतर देशांसाठी एकमात्र व्यवहार्य पर्याय आहे, असे काहीजणांचे मत आहे. भारत अलीकडेच संयुक्त सागरी दलांचा सदस्य झाला आहे आणि भारताच्या नौदलाने पश्चिम हिंदी महासागरात या संयुक्त नौदलांसोबत सरावही केला आहे. हे संयुक्त सागरी दल चालवणाऱ्या पाच कृतीदलांपैकी संयुक्त कृती दल 153 हे लाल समुद्रातील सुरक्षेचे प्रभारी आहे. हे दल समृद्धी संरक्षक मोहिमेचे नेतृत्व करण्याची शक्यता आहे. भारताचे नौदल हे या संयुक्त दलांना स्वतंत्र गस्तीवर असलेल्या युद्धनौकांसह एक सुरक्षित ट्रान्झिट कॉरिडॉर तयार करण्यात मदत करू शकते आणि आतील पाण्याचे निर्जंतुकीकरणही करू शकते. या प्रयत्नाचे यश दक्षिणी लाल समुद्रापासून एडनच्या आखातापर्यंत आणि पलीकडे पसरलेले सुरक्षित क्षेत्र तयार करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल.

हौथी अतिरेकी इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्षाच्या जटिल भौगोलिक राजकारणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करत असतात. हेच अतिरेकी आता जागतिक शक्तींमधील मतभेदांचा फायदा घेऊन हिंदी महासागरातील अरबी समुद्रासारख्या असुरक्षित भागात आणखी पुढे जाण्याची शक्यता आहे. हौथी अतिरेक्यांचे हल्ले इस्रायलशी संबंधित व्यावसायिक जहाजांपुरते मर्यादित नाहीत हेही आता समोर आले आहे. लाल समुद्रात अतिरेक्यांनी लक्ष्य केलेल्या एमव्ही साईबाबा टँकरचा इस्रायलशी उघडपणे काहीच संबंध नव्हता.

या अतिरेकी हल्ल्यांमुळे जागतिक व्यापार अडचणीत आला आहे. त्यामुळे हौथींच्या धोक्याला वेळीच आवर घालण्याची गरज आहे हे जागतिक शक्ती ओळखून आहेत. हॅपग-लॉयड, मार्स्क, सीएमए सीएमजी आणि एमएससी यासह टॉप जागतिक शिपिंग कंपन्यांपैकी दहा कंपन्यांनी लाल समुद्रातील त्यांच्या सेवा निलंबित केल्या आहेत, त्याचप्राणे आणखीही काही कंपन्यांनी त्यांचे अनुकरण करण्याचे ठरवले आहे. प्रादेशिक जहाज व्यापाराचे संरक्षण करण्यासाठी नौदलांची युती बनवून जागतिक जहाजांना आश्वस्त करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न अद्याप योग्यरित्या पूर्ण झालेला नाही. समृद्धी संरक्षक या मोहिमेला सुरुवातीला 20 हून अधिक देशांनी पाठिंबा दिला. पण फ्रान्स, इटली आणि स्पेनने यातून माघार घेतल्याने या युतीला मोठा धक्का बसला आहे.

प्रमुख सागरी शक्तींमध्ये राजकीय मतभेद असले तरी एका मुद्द्यावर एकमत आहे ते म्हणजे हौथी धोक्याचा सामना करण्यासाठी देशांची सामूहिक तयारी करणे. समुद्रात ड्रोनविरोधी युद्धाची रणनीती अजूनही विकसित होत आहे आणि ड्रोनला लक्ष्य करण्याच्या काही पद्धती वाटतात तितक्या प्रभावी नाहीत, असे नौदल तज्ज्ञांचे म्हणणे आहे. गेल्या आठवड्यात लाल समुद्रात अमेरिकेच्या युद्धनौकांनी 14 सशस्त्र ड्रोन पाडल्याचा दावा केला होता. यासाठी कोणती शस्त्रे वापरली गेली हे कळू शकले नाही परंतु क्षेपणास्त्रांच्या संयोजनात लांब पल्ल्याच्या तोफा वापरण्यात आल्या असण्याची शक्यता आहे. हिंदी महासागरातील नौदलांकडे हौथींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी आवश्यक समन्वय आणि आंतरकार्यक्षमता नाही हे इथले देश जाणून आहेत.

प्रमुख सागरी शक्तींमध्ये राजकीय मतभेद असले तरी एका मुद्द्यावर एकमत आहे ते म्हणजे हौथी धोक्याचा सामना करण्यासाठी देशांची सामूहिक तयारी करणे.

आणि तरीही पश्चिम हिंदी महासागर हे ड्रोनच्या धोक्यावरचे संभाव्य उत्तर आहे. सुधारित परिस्थितीजन्य जागरूकता आणि उत्तम साधनांसह हे सागरी सैन्य हौथी अतिरेक्यांच्या ड्रोनचा सामना करू शकते. हौथी अतिरेक्यांचा सामना करायचा असेल तर प्रादेशिक नौदलाने त्यांच्या सुरक्षित कोशातून बाहेर पडणे आणि त्यांच्या रणनीतीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. य़ा क्षेत्रात भारत आणि इतर हिंद महासागरातील देशांनी अधिक सक्षम आणि इच्छुक भागीदारांसोबत काम केले तरच जागतिक व्यापार सुरक्षित होऊ शकेल.

# तिळगुळ घ्या... गोड गोड बोला.....!!

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १५ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!



# स्वरयोगिनी डॉ प्रभा अत्रे

किराणा घराण्याच्या जेष्ठ गायिका, ज्यांनी आपल्या गायन कलेने शास्त्रीय संगीताला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले त्या स्वरयोगिनी डॉ प्रभा अत्रे यांचे शनिवारी वृद्धपकाळाने निधन झाले. जेष्ठ गायिका हिराबाई बडोदेकर व त्यांचे बंधू सुरेशबाबू माने यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेऊन त्यांनी गायनाला सुरुवात केली. ख्याल गायकीसह ठुमरी, दादरा, गझल, उपशास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, भजन व भावगीत यांचे प्रभुत्व होते. आपल्या कार्यक्रमात त्या अनेकदा स्वतः रचलेल्या बंदिशी रचत. त्यांनी स्वतःच्या स्वतंत्र शैलीत संगीतातील नवे राग निर्माण केले. शास्त्रीय संगीताचा जगभर प्रसार व्हावा म्हणून त्यांनी डॉ प्रभा अत्रे फाऊंडेशनची स्थापना केली. या फाऊंडेशनच्या मार्फत त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताचा जगभर प्रचार केला. भारतीय शास्त्रीय संगीताचा जगभर प्रसार करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. डॉ प्रभा अत्रे या केवळ शास्त्रीय गायिकाच नव्हत्या तर त्या संगीत रचनाकार, लेखिका, प्राध्यापिका आणि विदुषीही होत्या. त्यांनी इंग्रजी व हिंदी भाषेत संगितावर अनेक पुस्तके लिहिली आहेत. प्रभा अत्रे यांनी आपले संपूर्ण आयुष्य शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसार करण्यात घालवले. त्यांच्या संगीत कलेची दखल घेऊन शासनाने त्यांना पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण हे तिन्ही मानाचे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने शास्त्रीय संगीताचा एक आयाम संपला आहे. डॉ प्रभा अत्रे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



# गऱ्हाटीची वाट - एका दमलेल्या परंतु जबर चिकाटी असलेल्या बापाची कहाणी

गऱ्हाडीची वाट हे अनंत देवजी राऊत लिखित पुस्तक वाचले.. हाती घेतल्या घेतल्या वाचुनही काढले.. गऱ्हाडीची वाट या नावातच संपूर्ण जीवन कनाथक सामावलंय इतकं अचूक नाव या पुस्तकाला दिलंय.

गऱ्हाडीची वाट चा अर्थ बैलगाडी चा रस्ता धुळीनं-मातीनं भरलेला, कधीही समतल नसलेला- कधीकधी गाडीचं एक चाक टेकाडानं वर तर कधी खाली असा तो रस्ता.... संसाराचा मार्गही असाच.. ह्यावर जीवनाचा हा गाडा हाकताना कधी हळू हळू, अडखळत तर कधी वाट समतल मिळाळ्यास थोड्या वेगानं जायचं...

लेखकानं हेच मांडलंय.

देवावर विश्वास, त्यास श्रमाची पराकाष्ठा करत, आपल्या संसारात दोन क्षण सुखाचे नि ऐश्वर्याचे यावेत म्हणून केलेले प्रयत्न यात मांडलेत.

भाषा प्रवाही आहे.. त्यामुळे कथानक पूढे पूढे सरते.. रेंगाळत राहात नाही.

त्यामुळे वाचकाला कंटाळा येत नाही. हे लेखकाच्या लेखन शैलीचे वैशिष्ट्य.

जे घडले ते जसेच्या तसे मांडले, कुणाला काय वाटेल ह्याचा विचार नकरता मांडले आहे, हे जीवन प्रसंग मांडताना लेखकाला ना कुणावर रोष आहे ना राग.. जीवनात खुप कष्ट सोसले परंतू आयुष्याबद्दल त्यांची कुठलीही तक्रार नाही.

भंडारी-वाडवळ वाद आणि या बद्दलते मांडतात ते त्यावेळी एखाद्या समाजाविषयी असलेलं दुस-या एका जातीतील जनांचं जनमतच हे वाचताना लक्षात येतं .. त्या मुळे तो व्यक्तिगत आकस म्हणून धरता येत नाही.

जे जसे घडले तसे लिहिताना लेखक इतके प्रामाणिक आहेत की आपल्या स्वभावातील दोष सुद्धा मांडतात.

त्याचवेळी आपली पत्नी हिच्या बद्दल बोलताना एक आदरयुक्त प्रेम प्रतित करतात.

आज सर्व असताना ती नाही म्हणून एकाकी पणाची भावनाही ते व्यक्त करतात.

हे पुस्तक जरी जीवन चरित्र म्हणून असलं तरी समाजाचा केंद्रबिंदु हा मानव आहे त्यामुळे हे पुस्तक तत्कालीन व्यक्ती-समाजाचे प्रतिनिधि त्व करते. हे पुस्तक तत्कालीन समाजाचे ऐतिहासिक दस्तावेज मांडणारेच ठरते.

1903, 1940-41 सालची दुष्काळी परिस्थिती व त्याच्या नोंदी तर स्थानिय इतिहास अभ्यासकाला आणि संशोधकाला मोलाच्या ठरतील.

हल्ली इतिहासात कधी नव्हे ते स्थानिय इतिहासास अन्योन्य महत्व प्राप्त झाले आहे. हे पहाता स्वातंत्र पूर्व स्वातंत्र्योत्तर ह्याच्या काही सामाजिक नोंदी यात मिळतात.

एकुणच हे पुस्तक ललित साहित्य आणि स्थानिय इतिहास या दोहीं दृष्टीने मोलाचे ठरते.

हे पुस्तक जीवनातील घटनांचा ज्या काळजात घर करुन राहिलेल्या आठवांचा त्या आठवांचा पाझर आहे. पण हे अधिक विस्तृत लेखकानं मांडलं असतं तर स्थानिय संस्कृती, विचारासोबत चिन, पाक यांच्या सोबतचे देशाचे युद्ध , इंदिराजीं लादलेली आणीबाणी, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन या काळात काय विचार करत होती हेही कळले असते.

तेन ह्या विचारवंतानं सर्वप्रथम समाज आणि साहित्य याचा अन्योन्य संबंध या विषयी विचार मांडले तेव्हापासून साहित्याची समीक्षा ही मांडली जाऊ लागली..

सामाजिक दृष्टीचा विचार करता तत्कालीन आर्थिक स्थिती, अंधश्रद्धा, शिक्षणाच्या अपु-या सोई ह्याच्या नोंदी मिळतात. शिक्षणाच्या बाबतीत वाचताना मला We The People या पुस्तकात नानी पालखीवाला यांनी नोंदवलेले मत आठवले ते म्हणतात स्वातंत्राच्या पन्नासाव्या वर्षात भारताने आपल्या अर्थसंकल्पात शिक्षणात केलेली कमी गुंतवणूक ही सर्वात मोठी चूक होती...

एकुणच पुस्तक सर्व दृष्टीने उत्तम आहे. हे पुस्तक प्रत्येकाच्या संग्रही असावे असेच आहे.

**गऱ्हाडीची वाट**
**लेखक : श्री अनंत देवजी राऊत**
**हर्ष प्रकाशन**

विशाल धर्माधिकारी (लेखक,कवी)



## म ह त्त्वा चे

### पाच दुचाकी जळाल्या

**पनवेल:** खांदा कॉलनी येथील सोसायटीमध्ये सहा दुचाकींना आग लागली. या आगीमध्ये पाच दुचाकी जळून खाक झाल्या आहेत.खांदा कॉलनी सेक्टर 7 प्लॉट नंबर 28 बल्लाळेश्वर अपार्टमेंट या बिल्डिंगच्या पार्किंग मध्ये एकूण सहा मोटरसायकलला आग लागली होती. नवीन पनवेल येथील सिडको अग्निशामक दलाला याची माहिती मिळताच त्या घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी फायर इंजिनच्या पंपापासून एक होजची लाईन तयार करून व होज रील होजच्या साह्याने सदरची आग पूर्णपणे विझविली. सदरच्या आगी मध्ये सहापैकी एकूण पाच बाईक जळून खाक झाल्या आहेत व एक बाईक थोड्या प्रमाणात जळाली आहे . ही आग कशी लागली आणि कोणी लावली हे समजू शकलेले नाही या प्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### धानकान्हे गावजवळ जंगलात वणवा

**खांब :** रोहा तालुक्यातील अंतर्गत खांब ते पालदाड पार्गावरील धानकान्हे गावाच्या हद्दीत शेती क्षेत्रात आज भर दुपारच्या सुमारास अज्ञाताने लावलेल्या वणव्यामुळे सर्वत्र एकच हाहाकार उडाला.

भर दुपारच्या सुमारास धानकान्हे गावाच्या हद्दीत शेती क्षेत्रात कोणी अज्ञाताने वणवा लाऊन दिला. प्रखर ऊन आणि वाऱ्याच्या झोताबरोबर बघता बघता वणव्याची व्याप्ती पसरून बागायती शेती व कडधान्ये पिकालाही या वणव्याची झळ पोहचून बागायती शेती व कडधान्ये पिकेही होरपळून गेली.तर शेतकरी वर्गाने गुरांसाठी साठवलेला चाराही जळून खाक झाल्याने शेतकरी वर्गाला फार मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे.

### उरण- पनवेल मार्गावर वाहनांच्या रांगा

**उरण :** शनिवारी दुपारी जासई उड्डाणपूलाची मार्गिका पार करताना वाहन बंद झाल्याने जासई उड्डाणपूल ते गव्हाण फाटा व जासई गाव या मार्गावर वाहतूक कोंडी झाली आहे. जासई उड्डाणपूलाची एकच मार्गिका सुरू असल्याने उरण कडून पनवेल-नवी मुंबई कडे जाणारी वाहने पुलावर जासई गावाच्या दिशेने खालच्या बाजूने ये जा करीत आहेत. पनवेल व नवी मुंबईच्या दिशेने येणाऱ्या वाहनांना थांबावे लागत आहे. त्यामुळे वाहन कोंडीचे ठिकाण बनले आहे. तर दुसरीकडे जासई उड्डाणपूलाच्या खालच्या दिशेने येणारी कंटनेर वाहने ही एकमेकांच्या विरोधी दिशेने येत असल्याने खालच्या रस्त्यावर ही वाहनांची कोंडी झाली आहे.



**पनवेल।** भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे झुंजार लोकनेते, दिवंगत दि. बा. पाटील यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिबासाहेबांच्या पनवेल येथील संग्राम निवासस्थानी विनम्र अभिवादन केले.

# स्वच्छता अभियान लोकचळवळ व्हावी -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

प्रतिनिधी
■ ठाणे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार राम मंदीरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यभर मंदीर स्वच्छ करण्याचे अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केली. तसेच पंतप्रधान मोदी यांच्या पाऊलावर पाऊल ठेवत मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वत: प्राचीन कौपीनेश्वर मंदीराची स्वच्छता करून या अभियानाला सुरूवात केली.

सर्वंकष स्वच्छता अभियानांतर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी ठाणे येथील प्राचीन कौपिनेश्वर मंदिर स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेतला. अयोध्येतील राम मंदीरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्व नागरिकांनी सर्व तीर्थ क्षेत्रे, मंदीरांमध्ये २२ जानेवारीपर्यंत स्वच्छता मोहिम राबवून श्रमदान करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्यानुसार राज्यभर मंदीर स्वच्छ करण्याचे अभियान राबविण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केली. ठाणे शहरातील मंदिरे स्वच्छ करण्याबरोबरच त्याठिकाणी रोषणाई करण्याच्या सुचना पालिका आयुक्तांना दिल्या असून राज्यभरातही मंदीर स्वच्छतेवर राज्य सरकार लक्ष केंद्रीत करणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात स्वच्छता भारत अभियान राबविले. याच प्रेरणेतून राज्यात सर्वंकष स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. स्वच्छ भारत अभियानाप्रमाणेच सर्वंकष स्वच्छता अभियानानाला नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. या अभियानामुळे मुंबई आणि ठाणे परिसरातील प्रदुषणात मोठी घट झाली आहे, असा दावा त्यांनी केला.

सर्वंकष स्वच्छता अभियान ही एक लोकचळवळ निर्माण करायची आहे. या चळवळीच्या माध्यमातून राज्य स्वच्छ, सुंदर, हिरवेगार आणि निरोगी करण्याचे आहे, असेही ते म्हणाले.



**जनता टिकाकारांना जागा दाखवेल**

*टिका करणाऱ्यांचे राममंदिराचे प्रेम बेगडी आहे. हेच म्हणायचे मंदिर वही बनायेंगे तारीख नहीं बतायेंगे. पण मोदींनी मंदिर पण तयार केले आणि तारीख पण जाहीर केली. त्यामुळे जनता टिकाकारांना ओळखून आहे आणि त्यांना जनता योग्यवेळी जागा दाखवेल, असा टोलाही मुख्यमंत्री शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगावला.*

# उपवन तलावाचे सौंदर्य आणखी उजळले - मुख्यमंत्री शिंदे

प्रतिनिधी
■ ठाणे

ऐतिहासिक ओळख असलेल्या निसर्गरम्य उपवन तलावाचे सौंदर्य संगीतमय कारंजे आणि बनारसच्या धर्तीवरील घाटामुळे आणखी उजळले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. शुक्रवारी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते याचे लोकार्पण झाले.

राज्य सरकारच्या निधीतून ठाणे महापालिकेने उपवन तलाव येथे संगीतमय कारंजे आणि घाट यांची उभारणी केली आहे. संगीतमय कारंजे हे 'वॉटर स्क्रीन'सह असून प्रेक्षकांसाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील तीन शो तयार करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, ठाणे शहराचा इतिहास आणि राम मंदिर असे विषय आहेत. हे कारंजे आणि घाट यांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संस्कृती कला उत्सवाच्या तरंग या पाण्यावरील रंगमंचावर करण्यात आले.

याप्रसंगी खासदार श्रीकांत शिंदे, आमदार प्रताप सरनाईक, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी नगरसेविका परिषा सरनाईक, आशा डोंगरे, जयश्री डेव्हिड, माजी नगरसेवक पूर्वेश सरनाईक, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर आदी मान्यवर उपस्थित होते.



ठाणे शहर आता बदलू लागले आहे. स्वच्छ होत आहे, रस्ते चांगले होत आहेत. महापालिकेची सर्वंकष स्वच्छता मोहीम उत्तम सुरू आहे. आपल्याला ठाणे शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी करायचे आहे, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. उपवन तलाव परिसरात ठाणेकर आतापर्यंत फक्त चालायला, फिरायला यायचे आता त्यांना या संगीतमय कारंजाचाही आनंद घेता येईल. नागपूरला फुटाळा तलावातील कारंजे पाहिल्यावर आमदार सरनाईक यांना असे कारंजे ठाण्यात करण्याबद्दल बोललो होतो. त्यांनी पुढाकार घेऊन वर्षभरात कारंजे सुरू करूनही दाखवले, असे मुख्यमंत्री म्हणाले. तसेच, येथील शो विनामूल्य ठेवावेत, असे निर्देशही त्यांनी महापालिका आयुक्तांना दिले मुख्यमंत्र्यांमुळे ठाण्यात विविध प्रकल्प साकारणे शक्य झाले आहे. असे आणखी दोन संगीतमय कारंजे लवकरच सुरू होतील, अशी माहिती आमदार सरनाईक यांनी दिली.

## अदिती तटकरे यांचा मुंबई ते बदलापूर लोकल ने प्रवास

जाणून घेतल्या प्रवाशांच्या समस्या!

■ बदलापूर

बदलापुरात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित महिला व युवती मेळाव्यात महिलांना संबोधित करण्यासाठी, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी मुंबई ते बदलापूर लोकल ने प्रवास करत उपस्थिती लावली. मुख्य म्हणजे मुंबई ते बदलापूर प्रवासात येणाऱ्या अडचणी या निमित्ताने प्रवाशांसोबत चर्चा करत जाणून घेतल्या. यावर त्या संबंधित विभागाकडे नक्कीच पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी यावेळी प्रवाशांना आश्र्वस्त केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष बदलापूर शहराध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, ठाणे ग्रामीण जिल्हा युवती अध्यक्षा प्रियांका




दामले यांच्या संयोजनातून बदलापूर पूर्व कात्रप येथील गुप्ते म्हसकर सभागृहात आयोजित महिला व युवती मेळाव्यात बचत गट, अंगणवाडी सेविका यांसह विविध क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. यावेळी उपस्थित महिलांशी त्यांच्या समस्या जाणून घेत, अदिती तटकरे यांनी त्या सोडविण्यासाठी महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून हवी ती मदत केली जाईल असे आश्वासित केले.

## डोंबिवलीतील इमारतीला भीषण आग; पाच ते सहा मजले जळून खाक

प्रतिनिधी
■ डोंबिवली

डोंबिवली येथील एका इमारतीला आग लागल्याची घटना घडली आहे. खोणी पलावा येथील आलोरिया या इमारतीत भीषण आग लागली. आगीत पाच ते सहा मजल्याच्या गॅलरी जळून खाक झाल्या आहेत. फायर ब्रिगेडच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत.

सातव्या मजल्यावर आग लागली होती. त्यानंतर ती इतर मजल्यांवर पसरत गेली. सुदैवाने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यापर्यंतच लोक राहत होते. आग लागल्याचे समजल्यानंतर सर्व रहिवासी सुखरुप बाहेर पडले आहेत. आगीच्या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचे सांगितले जाते.



व्हिडिओमध्ये आगीचं भीषण रुप दिसून येत आहे. घटनेची माहिती मिळताच फायर ब्रिगेडच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आहेत. आग विझवण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. जीवितहानीची कोणतीही माहिती नाही.

खोणी पलावा येथील आलोरिया या इमारतीत शनिवारी दुपारच्या सुमारास भीषण आग लागली होती. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार इमारतीच्या एका मजल्यावरील घर मालक वॉशिंग मशीन बंद करण्यास विसरून गेल्याने तिच्यातील कॉम्प्रेसरचा स्फोट झाला. आगीची माहिती मिळताच केडीएमसीच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी भेट देत आगीवर नियंत्रण मिळवलं आहे. सुदैवाने या आगीत कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नसून इमारतीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.

## नवी मुंबई विमानतळासाठी आता मार्च 2025 ची मुदत

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची शनिवारी दुपारी पहाणी केल्यानंतर केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री जोतिरादित्य शिंदे हे विमानतळ ३१ मार्च २०२५ रोजी पर्यत कार्यान्वित होऊ शकेल, अशी माहिती पत्रकारांशी बोलताना दिली. शुक्रवारी नागपूरात बोलताना शिंदे यांनी हे विमानतळ याच वर्षी नोव्हेंबर अथवा डिसेंबर महिन्यात सुरु होईल असे सांगितले होते.

शनिवारी सिडको तसेच नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमीटेड (एनएमआयएएल) कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत




घेतलेल्या बैठकीनंतर शिंदे यांनी ही नवी तारीख जाहीर केली. या विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते स्वर्गीय दि.बा.पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच घेतील, असेही ते यावेळी म्हणाले. मुंबईच नव्हे तर देशाच्या विकासात मैलाचा दगड ठरणारे हे विमानतळ डिसेंबर २०२४ पर्यत प्रवाशांच्या सेवेत असावे असे लक्ष्य आम्ही समोर ठेवले आहे.

# नवी मुंबईत बांधकाम व्यावसायिकाची हत्या

### पोलिसांकडून मारेकऱ्यांचा शोध सुरु

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

उलवे भागात राहणाऱ्या एका बांधकाम व्यवसायीकाची सीवूड सेक्टर-44 मधील त्याच्या कार्यालयात डोक्यात गोळ्या झाडुन हत्या करण्यात आल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.

मनोज सिंग (39) असे या बांधकाम व्यावसायीकाचे नाव असून शनिवारी सकाळी 11 च्या सुमारास त्याच्या कार्यालयात काम करणाऱ्या दोन मुली कार्यलयात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या घटनेनंतर एनआरआय पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल




केला आहे. मनोज सिंग याची हत्या त्याच्या जवळच्याच व्यक्तीने केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून मारेकऱ्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील मृत मनोज सिंग हा उलवे भागात राहण्यास होता. तसेच सीवूड सेक्टर-44 भागात त्याचे अमन डेव्हलपर्स नावाचे कार्यालय आहे. मनोज सिंग याचे उलवे परिसरात काही इमारतीच्या बांधकामाचे प्रकल्प सुरु होते. शुक्रवारी रात्री 11.30 वाजण्याच्या सुमारास मनोज सिंग याने आपल्या पत्नीला फोन करुन त्याला भेटण्यासाठी कार्यालयात काही व्यक्ती येत असल्यामुळे त्याला घरी पोहोचण्यास उशीर होत असल्याचे तसेच पत्नी व मुलांना जेवून झोपण्यास सांगितले होते.

यादरम्यान, शुक्रवारी रात्री उशीरा मनोज सिंग याला भेटण्यासाठी त्याच्या कार्यालयात आलेल्या अज्ञात व्यक्तीने मनोज सिंग याच्या डोक्यात दोन गोळ्या झाडुन त्याची हत्या करुन पलायन केले. शनीवारी सकाळी 11 च्या त्याच्या कार्यालयातील दोन मुली कामावर आल्यानंतर मनोज सिंग रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे निदर्शनास आले.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात पालिकेकडून 'मराठी भाषा जागर'

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने जारी केलेल्या 19 डिसेंबर 2023 रोजीच्या परिपत्रकानुसार 14 ते 28 जानेवारी 2024 या कालावधीत संपूर्ण राज्यभरात 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात येत आहे. त्यास अनुसरून साहित्यप्रेमी महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून मान्यवरांच्या व्याख्यानांसोबत अधिकारी, कर्मचारीवृंदामधील मराठी साहित्यप्रेमाला वाव देत नानाविध स्पर्धा उपक्रम संपन्न होत आहेत.

या कार्यक्रमांतून संपन्न मराठी भाषेचा प्रचार – प्रसार व्हावा तसेच कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर व्हावा अशाप्रकारे पंधरवडा कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यातील कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवार, 15 जानेवारी रोजी सुप्रसिध्द साहित्यिक, व्याख्याते प्रा.प्रवीण दवणे यांच्या 'मायबोली मराठी' या विषयावर उपस्थितांशी हृदयसंवादाने होणार असून सकाळी 11 वा. नमुंमपा मुख्यालयातील ॲम्फीथिएटर येथे हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

मंगळवार, 16 जानेवारी रोजी सकाळी 11 वा. महाराष्ट्र शासनाचे निवृत्त माहिती संचालक, नाटककार आणि ललित लेखक श्री. प्रल्हाद जाधव यांचे कार्यालयीन कामकाजात मराठीचा वापर या अनुषंगाने 'वाणी, भाषा, लेखणी... (शासकीय कामकाजातील यशाची त्रिवेणी)' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

## पहिल्याच दिवशी उरण-खारकोपर लोकल ट्रेनला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी
■ उरण

शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरू झालेल्या उरण – खारकोपर लोकलला उरणच्या प्रवाशांनी प्रचंड उत्साहाने प्रतिसाद दिला आहे. शनिवारी सकाळ पासूनच स्थानकात प्रवाशांची वर्दळ सुरू झाली होती. उरण स्थानकातून सकाळी ६ वाजून ५ मिनिटांची नेरुळसाठी पहिली लोकल सुटली. या पहिल्या लोकलने नवी मुंबई आणि मुंबईत नोकरी



निमित्ताने प्रवास करणारे चाकरमानी, विद्यार्थी आणि व्यावसायिक यांनी लाभ घेत प्रवास केला. साधारणतः अर्ध्या तासांनी सुटणाऱ्या प्रत्येक लोकलने उरण मधील प्रवासी प्रवास करीत असतांना दिसत होते. लोकलच्या प्रारंभीच उरणच्या प्रवाशांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.

## स्वच्छ सर्वेक्षण अभियान 2023, उल्हासनगर महापालिका देशात 110 वा तर राज्यात 21 व्या स्थानी

प्रतिनिधी
■ उल्हासनगर

केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२३ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने त्यांच्या श्रेणीत ४४६ पैकी ११० वा स्थान मिळवले आणि महाराष्ट्रात ४४ शहरांत २१ वे स्थान पटकावले असल्याची माहिती मनपाचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी दिली आहे.

स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२२ मध्ये उल्हासनगर मनपा देशात १५१वा तर राज्यात ३० वी होती. हे लक्षात घेता महापालिका प्रशासन विद्यमान प्रशासक व आयुक्त अजीज शेख यांच्या निर्देशाने, अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, उपआयुक्त (आरोग्य) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, सर्व आरोग्य अधिकारी, आरोग्य निरीक्षक, SBM तांत्रिक सल्लागार AIILSG,या शिवाय कायमस्वरूपी व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी यांनी स्वच्छता बाबत विशेष मोहीम राबविण्यासाठी काम केले, व २०२३ मध्ये अभूतपूर्व कामगिरी केली, त्याचप्रमाणे संपूर्ण टीमने सामाजिक संघटना, NGO व नागरिक यांचेसह संयुक्तिक काम करून, सफाई कर्मचाऱ्यांच्या मदतीने यश मिळवले.

घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, कचरा वेचण्याचे ठिकाण विकसित करणे आणि स्वच्छता व स्वच्छतेबाबत रहिवाशांमध्ये जनजागृती करणे यासारख्या विविध पद्धती राबवल्या असल्याचे लेंगरेकर यांनी सांगितले. स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये अभूतपूर्व कामगिरी साठी सर्व आरोग्य अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व कर्मचाऱ्यांचे मनपा आयुक्त अजीज शेख यांनी याप्रसंगी अभिनंदन केले.

## तलाव संवर्धनाच्या कामांनंतर तलावांचे शहर ही ठाण्याची ओळख अभिमानाने सांगता येईल

### ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाण्याची ओळख 'तलावांचे शहर' अशी अभिमानाने सांगता यावी, या दृष्टीने ठाण्यातील तलावांचे संवर्धन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तलाव जपणे हे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी अशाप्रकारच्या कार्यशाळांमधून आणखी चांगली दिशा मिळेल, असे प्रतिपादन ठाणे महापालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी 'तलावांचे शाश्वत संवर्धन' या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन करताना केले.

ठाणे महापालिकेतर्फे आयआयटी, मुंबई, सीएसआयआर (CSIR), आसीसीएसए (ICCSA) आणि बेग (BEAG) यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी माजिवडा येथील नागरी संशोधन केंद्र येथे तलाव आणि पाणवठे यांचे शाश्वत संवर्धन या विषयावरील एकदिवसीय



कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, सीएसआयआरचे संचालक राकेश कुमार, मुंबई महानगरपालिकेच्या शहर नियोजन विभागाचे उपसंचालक श्रीकांत देशमुख, उपायुक्त (पर्यावरण) अनघा कदम, महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दीप प्रज्वलन करून या कार्यशाळेचे उद्घाटन केले.

या कार्यशाळेचे उद्घाटन करताना, बांगर यांनी महापालिकेच्या वतीने तलाव संवर्धनासाठी होते असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तसेच, तलाव संवर्धनासाठी जास्तीचा निधी आवश्यक नसून संवर्धनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मेहनत करणाऱ्यांची गरज असल्याचे सांगितले. महापालिकेसोबत ग्रीनयात्रासारखी स्वयंसेवी संस्था एकत्र काम करीत असून सात तलावांच्या संवर्धनाची जबाबदारी ग्रीनयात्राने घेतली असल्याचे ते म्हणाले. तलाव संवर्धन हे सोपे काम नसले तरी ते अशक्य नाही. ठाण्यातील तलावांचे संवर्धन करून त्याचे अभिमानाने सांगता येईल असे ब्रॅडिंग करण्यात येईल, असेही बांगर म्हणाले. या कार्यशाळेमागील प्रेरणा ही सीएसआयआरचे संचालक राकेश कुमार यांची असून या कार्यशाळेचा सर्वच महापालिकांना उपयोग होईल, असेही बांगर यांनी स्पष्ट केले.

## दिव्यातील पाणीटंचाईला जबाबदार असणाऱ्या शिंदे गटाला पाण्यात बुडवा - उद्धव ठाकरे

प्रतिनिधी
■ दिवा - ठाणे

कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर असताना शनिवारी संध्याकाळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचा दिव्यात झंजावात पाहिला मिळाला. शिवसैनिकांशी संवाद साधताना दिव्यातील पाणीटंचाईला जबाबदार असणाऱ्या शिंदे गटाला पाण्यात असं बुडवा की पुन्हा त्यांनी डोकं वर काढू नये,असा हल्लाबोलच उद्धव ठाकरे यांनी पाणी प्रश्नावर बोलताना केला.

यावेळी शिवसेनेच्या महिला आघाडी कडून ज्योती पाटील यांच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांना गदा भेट देण्यात आली. दिवा आगासन रोड येथील ज्योती पाटील यांच्या कार्यालयाजवळ



स्वागत व कार्यालय भेट झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी दिवा टर्निंग येथे उपस्थित शिवसैनिकांना संबोधित केले. कल्याण लोकसभेतील गद्दारांची घराणेशाही गाडण्याचा निर्धार दिवावासीयांनी करावा असे आवाहन उद्धव ठाकरेंनी यावेळी केले.राम मंदिराच्या उद्घाटना बद्दल बोलताना उद्धव ठाकरे यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या व 22 तारखेला काळाराम मंदिर येथे शिवसेनेच्या माध्यमातून महाआरती केली जाणार असल्याचे यावेळी सांगितले. दिव्यात निवडणुका आल्या की दरवर्षी दहा एमएलडी पाणी वाढवल्याच्या घोषणा होतात. मात्र नागरिकांना पाणी मिळत नाही. 221 कोटीची पाणी योजना झाली पण लोकांना मुबलक पाणी मिळाले का?असा सवाल उद्धव ठाकरे यांनी दिवावासीयांना विचारला. यावेळी शिवसेना नेते संजय राऊत व राजन विचारे देखील उपस्थित होते.

# अगर आपके बाल हो गए हैं कमजोर, पतले और रुखे तो अब से अपना लीजिए ये उपाय

बाल की सुंदरता के लिए लोग क्या कुछ नहीं करते हैं. हेयर स्पा से लेकर केरेटिन, स्मूदनिंग तक कराते हैं. लेकिन बालों को लेकर इतने महंगे ट्रीटमेंट सबके बस में नहीं होता है. ऐसे में लोग देसी इलाज ढूंढ़ते हैं. क्योंकि ये अंदरुनी रूप से आपके बालों को पोषण देते हैं. ऐसे में चलिए जानते हैं बाल की ग्रोथ के लिए क्या करें जिससे उन्हें एक अच्छी देखभाल मिल जाए.

बालों से जुड़ी इस समस्या का कारण विटामिन बी 7 की कमी भी होता है. इसके लिए आपको रोज सुबह में अखरोट (Walnut) और बादाम (almond for hair care) खाना शुरू कर देना चाहिए. इससे आपके टूटे बाल रिपेयर हो जाएंगे और स्कैल्प में नमी भी आएगी.

जब भी आप हेयरवॉश करें तो बालों में कंडीशनर जरूर लगाएं. लेकिन आप बालों की जड़ों में कंडीशनर लगाने की भूल ना करें ये उन्हें कमजोर करता है. बस आप इसे ऊपर-ऊपर में लगाएं. ताकि बाल मुलायम बने रहें.

नींबू भी ड्राई स्कैल्प (dry scalp) में नमी लाने का काम करता है. इसमें फोलिक एसिड (folic acid) और फैटी एसिड (fatty acid) के साथ विटामिन ई, ए व सी से भी होता है. यह भी एक असरदार घरेलू नुस्खा (hair care nushkha) है.

पौटेशियम, एसेंशियल फैट्स और आयरन से भरपूर नारियल के दूध (Coconut Milk) को बालों में लगाने से बालों को बढ़ने में मदद मिलती है. इस दूध को घर पर तैयार करने के लिए ताजा नारियल घिस कर निचौड़ें



# इन लोगों को गलती से भी नहीं खानी चाहिए अरहर की दाल, हो सकता है सेहत को भारी नुकसान



रोजाना खाने में कुछ चीजें बहुत कॉमन हैं जिसमें से एक है अरहर की दाल. ये रोज खाई जाने वाली दाल है. इसके बिना खाना पूरा ही नहीं होता है. लेकिन क्या आपको पता है कि ये दाल सबको सूट नहीं करती है. आज इस लेख में हम आपको बताएंगे की आखिर किन लोगों को अरहर की दाल नहीं खानी चाहिए. इससे उन्हें क्या नुकसान होता है उसके बारे में बताएंगे.

जिन लोगों का यूरिक एसिड (uric acid) बढ़ा हुआ होता है उन्हें नहीं खाना चाहिए. क्योंकि इसमें प्रोटीन (protein) की मात्रा बहुत ज्यादा होती है. जिसके खाने से यूरिक लेवल अनियंत्रित हो सकता है. इस बीमारी में हाथ पैर और जोड़ों में सूजन की शिकायत होती है.

- किडनी (kidney) की बीमारी वालों को भी इस दाल से परहेज करना चाहिए. इसकी दाल में पोटैशियम की प्रचुर मात्रा होती है जो किडनी की समस्या को बढ़ाने का काम कर सकता है. इसके सेवन से पथरी जैसे रोग से भी जूझना पड़ सकता है.

- वहीं, जो लोग एसिडिटी की बीमारी से पीड़ित हैं उन्हें तो रात में कतई इसे नहीं खाना चाहिए. क्योंकि यह पचने में समय लेता है, जिसके कारण कच्ची डकार, पेट दर्द, गैस शुरू हो जाती है. कुछ लोगों को तो सिर तक में एसिडिटी बढ़ जाती है जिसके कारण सिर दर्द बना रहता है.

# Clothe Wash करते समय इन बातों का रखें ध्यान, कभी नहीं बदरंग होगा कपड़ों का रंग

घर की गृहणियों को रोजाना किसा ना किसी समस्या से जूझना पड़ता ही है. कभी जले बर्तन को साफ करने की टेंशन, कभी टाइल्स पर जमी गंदगी साफ करने को लेकर. इसके अलावा एक और टेंशन होती है वो है कपड़ों के रंग उड़ जाने की. अगर आप भी ऐसी किसी परेशानी से जूझ रही हैं तो हम यहां पर एक बहुत ही बढ़िया टिप्स बताने जा रहे हैं जिससे कपड़े बदरंग नहीं होंगे.

- कपड़ों का रंग उड़े ना इसके लिए आप इन्हें धुलने के बाद निचोड़े नहीं बल्कि ऐसे ही फैला दें. वहीं, कपड़ों को हमेशा उल्टा करके धूप में फैलाना चाहिए.
- वहीं, गरम पानी से कभी भी कपड़े नहीं धोने चाहिए. इससे भी कपड़ों का रंग उड़ता है. तो ऐसे में इस बात का भी ध्यान रखें. वहीं, कपड़ों को बहुत देर तक डिटर्जेंट में नहीं भिगाकर रखना चाहिए.



- और एक बात कभी भी सफेद कपड़ों को रंगीन कपड़ों के साथ नहीं धोना चाहिए. इससे उनका रंग उस पर आ जाता है. जिससे आपकी व्हाइट ड्रेस या शर्ट खराब हो जाती है. इसलिए यह एहतियात व्हाइट क्लोथ के साथ बरतना बहुत जरूरी है.
- बेकिंग सोडा और नींबू भी कपड़ों से दाग हटाने के लिए बेस्ट होता है. इसके लिए आपको 1 लीटर पानी में बेकिंग सोडा और 1 या 2 चम्मच नींबू का रस मिलाकर उसमें कपड़ा भीगो दीजिए 20 मिनट के लिए इससे दाग निकल जाएगा.
- अगर आप चाहती हैं कि कपड़ों से दाग गायब हो जाए तो बस आप बाजार से रबिंग एल्कोहल लेकर आइए और उसे कपड़ों पर रगड़ दीजिए. इससे बेहद आसानी से दाग निकल आएगा.

# बादाम से भी ज्यादा फायदेमंद है दूध में इस सूखे मेवे को डालकर पीना, पाचन से लेकर वजन तक पर पड़ता है असर

सूखे मेवों में अनेक एंटी-ऑक्सीडेंट्स, प्रोटीन, आयरन, कैल्शियम, मैग्नीशियम और जिंक जैसे पोषक तत्व और खनिज पाए जाते हैं. लेकिन, इन्हें दूध (Milk) में डालकर पीने पर कुछ कम असर नहीं दिखता बल्कि इनके फायदे और ज्यादा बढ़ जाते हैं. ऐसा ही एक सूखा मेवा (Dry Fruit) है जिसे दूध के साथ पीने पर शरीर को सबसे ज्यादा लाभ मिलता है. यह सूखा मेवा है खजूर. इसमें फाइबर, कार्ब्स, कैल्शियम, प्रोटीन, विटामिन ए, सी, ई, जिंक, फॉस्फोरस, पौटेशियम, कॉपर और आयरन भी पाया जाता है. यहां जानिए खजूर (Dates) को दूध के साथ पीने पर शरीर पर क्या प्रभाव पड़ता है और किस तरह से यह दूध सेहत के लिए अच्छा है. दूध और खजूर का एकसाथ सेवन करने के लिए 3 से 4 खजूर को दूध में रातभर भिगोकर रखा जाता है. अगली सुबह इस दूध को पीते हैं और इन भीगे हुए खजूर (Soaked Dates) को खाते हैं. इस दूध में बिल्कुल भी चीनी या शहद डालने की जरूरत नहीं होती क्योंकि खजूर प्राकृतिक रूप से बेहद मीठा होता है.



हड्डियों के लिए है अच्छा

दूध कैल्शियम से भरपूर होता है और हड्डियों की सेहत (Bone Health) के लिए भी अच्छा है. इसमें खजूर मिलाने पर कैल्शियम के साथ ही शरीर को सेलेनियम, मैग्नीशियम और कॉपर भी मिलता है जो हड्डियों के लिए अच्छा साबित होता है. इससे हड्डियों को मजबूती मिलती है और हड्डियों में दर्द या कमजोरी की शिकायत नहीं होती.

आयरन की कमी होती है पूरी

खजूर वाले दूध के सेवन से शरीर में हुई आयरन की कमी पूरी होती है. आयरन की कमी (Iron Deficiency) से अनीमिया हो सकता है. ऐसे में इस दूध को पीने पर इस दिक्कत से छुटकारा मिलता है. रक्त प्रवाह को बेहतर करने के लिए भी आयरन का सेवन अनिवार्य होता है.

स्किन के लिए है अच्छा

जैसाकि पहले भी बताया गया है कि खजूर एंटी-ऑक्सीडेंट्स और विटामिन सी से भरपूर होता है. इसे दूध में भिगोकर खाने पर और इस दूध को पीने पर त्वचा पर भी इसका असर देखने को मिलता है. स्किन से एक्ने कम होता है और एजिंग साइंस हल्के होने में मदद मिलती है.

पाचन होगा बेहतर

फाइबर से भरपूर फूड पाचन (Digestion) के लिए फायदेमंद होते हैं. इसी कारण खजूर को भी बेहतर पाचन के लिए खाया जा सकता है. इनमें फाइबर की अच्छी मात्रा पायी जाती है जो पेट के लिए अच्छी है. यह कब्ज जैसी दिक्कतों को भी दूर करता है.

दिमाग पर दिखता है असर

खजूर वाला दूध दिमाग के लिए अच्छा होता है. इसमें विटामिन बी6 की अच्छीखासी मात्रा पायी जाती हो जो पूरे दिमाग की सेहत के लिए फायदेमंद है. याद्दाश्त बढ़ाने के लिए खासतौर से खजूर खाए जा सकते हैं.

वजन बढ़ने में मिलेगी मदद

अगर आप बेहद पतले हैं और वजन बढ़ाने के बारे में सोच रहे हैं तो दूध में खजूर डालकर पीना आपके लिए बेहद अच्छा होगा. भीगे खजूर वजन बढ़ाने हैं, मसल्स को मजबूती देते हैं और आपको फिट रहने में मदद भी करते हैं.

# 5 अच्छी आदतें जो बदल देंगी आपकी जिंदगी, हेल्दी तन मन के लिए आज से ही फॉलो करें



भागदौड़ भरी जिंदगी में लोगों के पास आजकल अपने लिए ही वक्त नहीं है. ज्यादा कामकाज के चलते लोग ना तो अपने खान-पान पर फोकस कर पा रहे हैं और ना ही अपने शरीर को एक्टिव रखने का समय निकाल पा रहे हैं. ऐसे में जंक फूड का सेवन शरीर को और ज्यादा नुकसान पहुंचा रहा है. ऐसे में जरूरी है कि कुछ बेहद आसान आदतें अपनाकर अपनी जिंदगी को शानदार बनाया जाए क्योंकि बिना स्वस्थ शरीर के कुछ भी नहीं है. अपनी जिंदगी को बैलेंस करने के लिए जरूरी है कि थोड़ा सा वक्त अपने लिए निकाला जाए. इसके लिए कोई बड़ी कवायद करने की जरूरत नहीं है. छोटी छोटी लेकिन अच्छी आदतों से आप अपनी लाइफ को बड़े ही आराम से चेंज कर सकते हैं. चलिए जानते हैं ऐसी ही पांच अच्छी आदतें जो आपकी जिंदगी को खुशनुमा बना सकती हैं.

1) रोज बाहर जाकर टहलिए

वेट लॉस के लिए अगर जिम नहीं जा पा रहे या एक्सरसाइज करना भारी हो रहा है तो बस एक काम कीजिए. सुबह उठिए और बाहर जाकर थोड़ा सा वॉक कर लीजिए. ये ना केवल वेट लॉस के लिए अच्छा है बल्कि इससे आपकी मेंटल हेल्थ भी अच्छी बनी रहेगी. सुबह की ताजी हवा लेकर फेफड़े मजबूत होंगे और पूरे दिन के लिए शरीर एक्टिव हो जाएगा.

2) प्लेट का अंदाज बदलिए


